CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३०५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्स

## राज्य सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय; विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० फेब्रुवारी : राज्यात शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन राज्य सरकारने ठोस पाऊल उचलले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष 'टास्क फोर्स' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यासंदर्भातील परिपत्रक कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी जारी केले आहे.**





या टास्क फोर्सचे अध्यक्ष म्हणून विस्तार व प्रशिक्षण विभागाचे संचालक रफिक नाईकवाडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे आणि सोनाली शिळकर यांचा समावेश असणार आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबरच शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करणाऱ्या तज्ज्ञांनाही या कृती दलात स्थान देण्यात आले आहे.

'शिवार फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर संशोधन करणारे कृषी समाजशास्त्रज्ञ डॉ. विनायक हेगाणा आणि महिला शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर विशेष अभ्यास करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञ सृष्टी डोईजड यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे या टास्क फोर्सच्या कार्यपद्धतीत प्रशासकीय निर्णयांसोबत मानवी संवेदनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा समतोल साधला जाणार आहे.

राज्यात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विविध योजना व उपक्रम राबवले जात असले, तरी हवामान बदलामुळे वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक अडचणी, सामाजिक दबाव आणि मानसिक अस्थैर्य यामुळे शेतकरी अजूनही मोठ्या संकटात सापडत आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत मार्गदर्शन आणि मानसिक आधार देणे अत्यावश्यक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

### नेमके काम काय करणार?

– या टास्क फोर्सच्या माध्यमातून आपत्तीपूर्व, आपत्तीच्या काळात आणि आपत्तीनंतर शेतकऱ्यांना शेती, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक अशा चतुःसूत्री दृष्टिकोनातून मदत केली जाणार आहे. शेतकऱ्यांच्या समस्या स्वतंत्रपणे न पाहता एकात्मिक पद्धतीने त्यावर उपाययोजना करण्यावर भर दिला जाणार आहे. शेतकऱ्यांना नैराश्यातून बाहेर काढणे आणि संकटांना तोंड देण्यासाठी सक्षम बनवणे, हा या कृती दलाचा मुख्य उद्देश आहे.

– कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी स्पष्ट केले की, शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न केवळ आत्महत्येनंतर मदत देण्यापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, त्यांना मानसिक स्थैर्य देणे आणि आधीपासून सक्षम बनवणे अधिक महत्त्वाचे आहे. यासाठी कृषी विभागातील योजना इतर विभागांशी समन्वय साधून अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत.

## थोडक्यात...

### सोन्या - चांदीच्या दरात घसरण

**मुंबई:** आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये वाढ झाली होती. मात्र, आज मंगळवार १० फेब्रुवारी रोजी सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा एकदा घसरण झाली आहे. ऐन लग्नसराईमध्ये ही घसरण झाल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळणार आहे.गुंतवणूकदारांनी नफा वसुलीचं धोरण स्वीकारल्यामुळे मंगळवारी सकाळी वायदेबाजारात सोने आणि चांदीच्या दरात घसरण पाहायला मिळाली. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर एप्रिलच्या वायद्याचे सोन्याचे एका तोळ्याचे दर १.६ टक्क्यांनी म्हणजेच २५०० रुपयांनी घसरुन १,५५,५४६ रुपयांवर आले आहेत. तर, चांदीच्या वायद्याचे दर ४ टक्क्यांनी घसरले आहे. चांदीच्या दरात ११,००० रुपयांनी घसरण होऊन आता हे दर २,५१,५४४ रुपयांवर पोहोचले आहेत.

### भारत - पाक सामना होणार

**मुंबई:** भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना होणार की नाही, या मुद्द्यावर निर्माण झालेला तिढा अखेर सुटला आहे. टी-२० वर्ल्ड कप २०२६ अंतर्गत भारताविरुद्ध खेळण्यास नकार देणाऱ्या पाकिस्तानने अखेर माघार घेतली असून, खउउच्या मध्यस्थीनंतर १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे हा सामना होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (झउइ) भाराविरुद्ध सामना न खेळण्याची आक्रमक भूमिका घेतली होती. सुरक्षेच्या कारणास्तव बांग्लादेशने भारतात येण्यास नकार दिल्यानंतर पाकिस्तानने बांग्लादेशच्या समर्थनार्थ भारताविरुद्ध सामना बहिष्कृत करण्याची धमकी दिली होती. यामुळे खउउसह आंतरराष्ट्रीय क्रिकेट वर्तुळात अस्वस्थता निर्माण झाली होती.

### फंडाचे पैसे तात्काळ मिळणार

**मुंबई:** नोकरदार वर्गासाठी आनंदाची बातमी आहे. एझत्रझ्ज चे पैसे थेट णझख वरुन काढता येणार आहेत. आपल्या हक्काचे पैसे कर्मचाऱ्यांना आता कधीही काढता येणार आहेत. एप्रिल २०२६ रोजी काही नवीन बदल होणार आहेत. त्याचा थेट फायदा कर्मचाऱ्यांना होणार आहे. तुमच्या हक्काच्या एझत्रझ्ज मधील पैसे काढण्यासाठी आता क्लेम फॉर्म भरून दिवसेंदिवस वाट पाहण्याची गरज उरणार नाही. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेनं आपल्या ८ कोटी सदस्यांसाठी 'एझत्रझ्ज ३.०' ॲपमध्ये हे महत्त्वाचं आणि नवीन अपग्रेड आणत आहे. या अंतर्गत एप्रिल २०२६ पर्यंत एक नवीन मोबाईल प लाँच केला जाईल, ज्याद्वारे सदस्य थेट णझख वापरून आपल्या खात्यातील पैसे काढू शकतात.

### किया इंडियाचा करार

**मुंबई:** किया इंडियाने आज भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) सोबत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केल्याची घोषणा केली. या सहयोगांतर्गत त्यांच्या सार्वजनिक ईव्ही चार्जिंग नेटवर्कचा विस्तार करण्यात आला आहे, तसेच त्यांची के-चार्ज परिसंस्था देशभरात १५,००० हून अधिक चार्जिंग टचपॉइण्ट्सपर्यंत वाढली आहे. हा धोरणात्मक सहयोग किया ईव्ही ग्राहकांसाठी चार्जिंग सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध करून देतो, तसेच इलेक्ट्रिक वेईकल अवलंबनामधील सर्वात मोठ्या अडथळ्यांचे निराकरण करतो, जेथे रेंजसंदर्भात आत्मविश्र्वास निर्माण करतो.

### ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम

**मुंबई:** राज्यातील शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी राबवण्यात आलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत कार्यालयाची वेबसाइट, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफीस, कार्यालयाचा डॅशबोर्ड, व्हॉट्सऍप चॅटबॉट, -ख व इश्रेलङ्ग्लहरळप चा शासकीय कामकाजात वापर आणि ऋ्खड चा कामात वापर अशा ७ सर्वंकष मुद्यांवर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शासकीय कार्यालयांची निवड दि. २६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

### मणिपूर पुन्हा पेटलं !

**इंफाळ :** मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार उफाळून आला असून, उखरूल जिल्ह्यात सशस्त्र दहशतवाद्यांनी अनेक घरे जाळल्याने तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. तांगखुल नागा समुदायाच्या एका व्यक्तीवर काही जणांनी हल्ला केल्यानंतर ही घटना घडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.जिल्ह्यातील लिटान सरेखोंग गावात दोन आदिवासी गटांमध्ये तीव्र दगडफेक झाली. एकमेकांना भिडलेल्या दोन गटांना पांगवण्यासाठी सुरक्षा दलांना अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. तसेच, प्रशासनाला जमावबंदीचे आदेश लागू करावे लागले.

## नांदेडच्या महापौरपदी कविता मुळे तर उपमहापौरपदी दीपकसिंह रावत

**तभा वृतसेवा**

**नांदेड, दि. १० फेब्रूवारी :** नांदेड महापालिकेच्या महापौर, उपमहापौर पदासाठी आज निवडणूक घेण्यात आली. या महापौरपदी कविता मुळे तर उपमहापौर पदी दीपकसिंह रावत यांची निवड करण्यात आली आहे.





महापौर, उपमहापौर निवडीसाठी महापालिकेत जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज विशेष सभा घेण्यात आली. या सभेत महापौर, उपमहापौर निवडीसाठी मतदान घेण्यात आले. यात भाजपा शिवसेना युतीच्या कविता मुळे यांना ५० मते पडली तर उपमहापौर निवडणुकीत दीपकसिंह रावत यांना देखील ५० मते पडली. यात भाजपा ४५, महायुती ४ व अपक्ष १ असा समावेश आहे.

दरम्यान नांदेड महापालिकेत पहिल्यांदाच भाजपा महिला महापौर निवड झाली असून पक्षातील नेत्यांचे आभार व्यक्त करत खा. अशोक चव्हाण यांच्या संकल्पनेतील विकसित नांदेड करण्याचे ध्येय असल्याची प्रतिक्रिया यावेळी महापौर कविता मुळे यांनी दिली.

## उपमुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारताच दादांच्या प्रतिमेला अभिवादन करताना सुनेत्रा पवार भावूक

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० फेब्रुवारी :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आज मंत्रालयात पदभार स्वीकारला. त्याअगोदर सकाळी आपल्या पक्षाच्या नेत्यांसह सिध्दीविनायक मंदिरात जाऊन दर्शन घेतले.त्यानंतर चैत्यभूमीवर जाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना नतमस्तक झाल्या.

सुनेत्रा पवार भावूक:

सिध्दीविनायक मंदिर आणि चैत्यभूमीवर गेल्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश कार्यालयात जाऊन दादांच्या केबिनमध्ये प्रतिमेला अभिवादन केले. यानंतर मंत्रालयात पदभार स्वीकारला. यावेळी दादांच्या प्रतिमेला अभिवादन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार भावूक झाल्याचे पहायला





मिळाले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, युवा नेते पार्थ पवार,वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक, माजी मंत्री धनंजय मुंडे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे,सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे,पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे,प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर,माजी मंत्री अनिल भाईदास पाटील,आमदार सना मलिक शेख, आमदार सतिश चव्हाण, आमदार अमोल मिटकरी,आमदार विक्रम काळे, आमदार शेखर निकम, आमदार प्रतापराव चिखलीकर पाटील, आमदार राजू नवघरे, आमदार आशुतोष काळे,आमदार हिरामण खोसकर, आमदार पंकज भुजबळ,माजी आमदार झिशान सिद्दीकी, मुंबई कार्याध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस संजय तटकरे, सहकोषाध्यक्ष संजय बोरगे, आदींसह सर्व आमदार, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकासासाठी कटिबद्ध - किशोर शितोळे

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० फेब्रुवारी :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत नागरिकांनी भारतीय जनता पक्षाला मोठ्या प्रमाणावर मतदान करून जबाबदारी दिल्याबद्दल शहर भाजपच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे मतदारांचे अभिनंदन करताना, उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही, या शब्दांत विकासनिष्ठ भूमिकेचा पुनरुच्चार केला.

प्रभाग रचनेनुसार झालेल्या निवडणुकीत वेळ कमी असल्याने सर्व उमेदवारांना प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणे शक्य झाले नसतानाही नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत भाजपला मतदान केले, असे त्यांनी नमूद केले. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यातील नेतृत्वाच्या विकासाभिमुख कामगिरीवर विश्वास



ठेवून मतदारांनी कमळ चिन्हाला पसंती दिली, असेही ते म्हणाले.

नागरिकांचा विश्वास आणि आशीर्वाद स्वीकारत विकसित छत्रपती संभाजीनगर घडविण्याच्या वचनासाठी सर्व नगरसेवक कटिबद्ध असल्याचे शितोळे यांनी स्पष्ट केले. यासाठी रचनात्मक कार्यपद्धती, नगरसेवकांचे प्रशिक्षण आणि कामांचा नियमित आढावा घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले. नामांतरानंतरचे पहिले महापौर व उपमहापौर युतीला दिल्याबद्दलही त्यांनी नागरिकांचे आभार मानले.

### पलंगाखाली सापडला खजिना, मोलकरीण ३० लाखांचे दागिने घेऊन फरार

नवी दिल्ली: द्वारका येथे एका मोलकरणीने केलेल्या मोठ्या चोरीचा उलगडा दिल्ली पोलिसांनी केला आहे. जलदगतीने कारवाई करत, द्वारका सेक्टर-२३ पोलिसांनी केवळ आरोपी महिलेला अटक केली नाही, तर चोरीला गेलेला मालही जप्त केला आहे. अटक केलेल्या महिलेकडे अंदाजे ३० लाख रुपयांचे सोन्याचे दागिने असल्याचे आढळून आले, जे तिने तिच्या पलंगाखाली लपवले होते. ही घटना १ फेब्रुवारी २०२६ रोजी घडली. द्वारका सेक्टर २३ येथील एका रहिवाशाने त्याच्या घरातून मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम गायब झाल्याची तक्रार पोलिसांना दिली. त्याला त्याच्या मोलकरणीवर संशय आला, जी घटनेपासून बेपत्ता होती. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी एफआयआर नोंदवला.

## अपघाताच्या दोन दिवस आधी विमान गुजरातला गेलं होतं

### रोहित पवार यांची स्फोटक पत्रकार परिषद

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० फेब्रुवारी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेवर पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी अपघातग्रस्त विमानाच्या कंपनीवर निशाणा साधला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी रोहित पवार यांनी प्रेजेन्टेशन दाखवलं. यामध्ये मुंबई ते बारामतीचं अंतर २१० किमी सांगण्यात आलं. या प्रवासासाठी २७ मिनिटे लागतं, असं म्हटलं. तसेच विमानाची माहिती या प्रेजेन्टेशनमध्ये देण्यात आली. विमान कंपनीचे विजय कुमार सिंग आणि रोहित सिंग हे दोन मालक असल्याची माहिती रोहित पवार यांनी दिली.



विस्ता सेल्स प्रायव्हेट लिमिटेड या विमान कंपनीत २७ शेअर होल्टरर्स असल्याची माहिती रोहित पवार यांनी दिली. या कंपनीच्या ताफ्यात ७ लेअरजेट ४५ विमाने आहेत, अशी माहिती रोहित पवार यांनी दिली.

घटनेच्या दिवशी सकाळी ७.०२ ला सर्वजण पोहोचले. ७.०३ मिनिटाला पायलटने बारामतीला फोन करुन विजिबलिटी आहे का? याची चौकशी केली. ७.१० ला सगळं ठिक असल्याचं सांगण्यात आलं. ७.१७ ला विदीप जाधव पोहोचले. त्यानंतर ७.५० ला उपमुख्यमंत्री अजित पवार पोहोचले. ७.५६ ला विमान मुंबई विमानतळाच्या संपर्कात आले. ८.१० ला विमाने टेकऑप केलं. ८.२२ ला विमान लोणावळा जवळ आलं. ८.२५ ला विमान पुण्याजवळ आलं. ८.३० ला विमान यवत जवळ आलं. ८.३२ ला सुपे जवळ आलं. ८.४३ ते ८.४५ च्या दरम्यान अपघात झाला. ९.०० वाजता अजित दादा जखमी झाल्याच्या बातम्या. ९.४५ वाजता दादांचं निधन झाल्याच्या बातम्या आल्या, असं रोहित पवार म्हणाले.

यानंतर रोहित पवार यांनी विमानाच्या ॲपचे फोटो दाखवले. यामध्ये सर्व विमानांची माहिती मिळू शकते, अशी माहिती रोहित पवारांनी दिली. अपघातग्रस्त विमान हे १६ वर्षांपूर्वीचं आहे. अपघाताच्या दोन दिवस आधी हे विमान मुंबई ते सुरत आणि सुरत ते मुंबई असं फिरलं, अशी माहिती रोहित पवारांनी दिली.

# विलिनिकरण हा राष्ट्रवादीचा अंतर्गत विषय - मुख्यमंत्री फडणवीस

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १० फेब्रुवारी :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाचा प्रश्न हा त्यांच्या पक्षाचा आहे. त्याबाबत बोलणे मला योग्य वाटत नाही. योग्य वेळी अधिकृत घोषणा झाली, त्यांच्यात काही ठरले, तरच मी प्रतिक्रिया देईन. रोज उगाच पतंग कशाला उडवायचे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी स्पष्ट केले. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची वाटचाल सकारात्मक राहील, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला. आज त्यांची पहिली मंत्रिमंडळ बैठक होती. दुखवटा असल्याने औपचारिक स्वागत न करता शब्दसुमनांनी स्वागत करण्यात आले. कालच्या निवडणुकीत त्यांची कामगिरी समाधानकारक होती, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. मंत्रिमंडळ बैठकीत राज्याच्या विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने होणाऱ्या पुरंदर येथील विमानतळ प्रकल्पासाठी भूमी अधिग्रहणास मान्यता देण्यात आली आहे. निधी उभारणीसह संबंधित प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून ९६ टक्के शेतकऱ्यांनी संमती दिली आहे. १ जूनपर्यंत भूमी अधिग्रहण पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

तिसऱ्या मुंबईच्या संकल्पनेला गती देण्यासाठी अटल सेतूच्या जवळ एमएमआरडीएला नियोजन प्राधिकरण म्हणून दिलेल्या जागांवर सिडको आणि एमआयडीसीचे नियम लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे भूसंपादन आणि विकासकामे अधिक वेगाने करता येतील, असे मुख्यमंत्री म्हणाले.



जलसंपदा विभागासंदर्भातही मोठा निर्णय घेण्यात आला आहे. नाबार्डच्या माध्यमातून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घमुदतीचे कर्ज घेऊन ४० प्रकल्प आणि १०० कालवे पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. पुढील एक-दोन वर्षांत हे प्रकल्प पूर्ण झाल्यास साडेतीन लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून एकूण आठ लाख एकर क्षेत्राला ओलिताची सुविधा उपलब्ध होईल. राज्यातील सर्व विभागांना याचा लाभ होणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या कार्यक्रमावर राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेलाही मुख्यमंत्र्यांनी प्रत्युत्तर दिले. ज्यांना निमंत्रण मिळाले नाही, त्यांना त्याचे वाईट वाटत आहे. त्यामुळे ज्यांना निमंत्रण मिळाले, त्यांच्यावर टीका केली जात आहे. संघाला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्र्वभूमीवर समाजातील विविध क्षेत्रांतील लोकांना संघाबाबत स्पष्ट माहिती मिळावी, वाद-अपवाद दूर व्हावेत, यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, असे फडणवीस म्हणाले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त...

### नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन

**लातूर:** बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठान, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. श्री गोळवलकर गुरुजी यांच्या जन्मदिनानिमित्त दि.११ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्रतिवर्षाप्रमाणे नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन दयानंद सभागृहात संध्याकाळी सहा वाजता करण्यात आले आहे. सन २०२५-२६ या वर्षात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेचे शताब्दी वर्ष व पंडित दीनदयालजी उपाध्याय यांनी समाज उन्नतीसाठी मांडलेले एकात्म मानव दर्शन या सिद्धांताचे हीरक महोत्सवी वर्ष अशा विचारांच्या त्रिवेणी संगमाचा योग लक्षात घेऊन ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे. या व्याख्यानमालेत दि. ११ फेब्रुवारी बुधवार रोजी नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांचे एकात्म मानव दर्शन या विषयावर, मराठवाडा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनंतराव पांडे यांचे पंचपरिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्र निर्मिती तर दि.१३ फेब्रुवारी रोजी पुणे येथील आदित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष विद्यावाचस्पती गुरुदेव शंकरराव अभ्यंकर यांचे वंदे मातरम राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन या विषयावर व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानमालेस प्रमुख अतिथी म्हणून अनुक्रमे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशील दादा वाजपेयी, अष्टांग योग केंद्राचे संचालक योगाचार्य दिलीपराव भातलवंडे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेचे माजी कुलगुरू कर्नल डॉ. कारभारी काळे यांची उपस्थिती राहणार आहे.

### दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे हर्बोस्कोप राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा

**लातूर:** दयानंद शिक्षण संस्था लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या वतीने हर्बो स्कोप-२०२६ ही राष्ट्रीय स्तरावरील हर्बल ड्रग मायक्रोस्कोपिक इमेज स्पर्धा नुकतीच उत्साहात पार पडली. या स्पर्धेचा उद्देश हर्बल औषधांची सूक्ष्मदर्शकीय ओळख व प्रमाणीकरणाबाबत वैज्ञानिक समज वाढवणे, विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास घडवणे तसेच या क्षेत्रातील जनजागृती करणे हा होता.या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धे साठी देशभरातून एकूण १८८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धे स प्राप्त झालेल्या नोंदींचे मूल्यमापन इंस्टीट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई, राजस्थान युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस जयपुर, आर.सी. पटेल इंस्टीट्यूट ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर अशा नामांकित संस्थांमधील तीन स्वतंत्र तज्ज्ञ परीक्षकांनी केल्याने स्पर्धेतील पारदर्शकता व निष्पक्षता अबाधित राहिली. अशा या उपक्रमाबाबत दयालानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी आयोजकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देणारे असे उपक्रम भविष्यातही राबवावेत, असे मत व्यक्त केले. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे व कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद उपस्थित होते. हर्बोस्कोप स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना हर्बल ड्रग मायक्रोस्कोपी विषयातील ज्ञान वृद्धिंगत करण्याची तसेच संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्याची संधी मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

### उदगीर नगरपरिषदेचा अतिक्रमणावर हातोडा; नागरिकांतून होतेय स्वागत

**उदगीर :** उदगीर नगर परिषदेच्या निवडणुका संपन्न झाल्यानंतर नूतन नगराध्यक्ष आणि मुख्य अधिकारी यांच्या आदेशानुसार उदगीर शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. उदगीर शहरात वाढलेले अतिक्रमण आणि रस्त्याच्या दुतर्फा थांबणारे हातगाडी आणि ठेलेवाले यांच्यामुळे रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा होत होता. या संदर्भामध्ये वेळोवेळी ओरड करून देखील या गोष्टीकडे फारसे कोणी लक्ष देत नव्हते. मात्र निवडणुका झाल्यानंतर नगरपालिकेकडून मोठा निर्णय घेऊन अतिक्रमण हटाव ची मोहीम राबवली जात आहे.

उदगीर येथील भाजी मंडई परिसरात संध्याकाळच्या वेळी महिलांना आणि मुलींना भाजी घेण्यासाठी बाजारात जाणे देखील कठीण झाले होते. दुकानदाराचे दुकान समोर झालेले अतिक्रमण आणि दुसऱ्या बाजूला हातगाडीवाले, ठेलेवाले यांची गर्दी त्यातही रस्त्याच्या मध्यभागी करण्यात आलेली दुचाकीची पार्किंग यामुळे रस्ता अत्यंत अरुंद झाला होता. त्या रस्त्याला मोकळा श्वास घेण्याची संधी आता अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे मिळू शकेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. एका बाजूला या अतिक्रमण हटामुळे काही लोक समाधान व्यक्त करत आहेत. तर काही लोक गोरगरिबांच्या रोजी रोटी वर गदा आणला जात आहे अशी उरळी करत आहेत.

### पदाधिकारी कार्यकर्ते व जनतेचे मनःपूर्वक आभार : आ. देशमुख

**लातूर:** लातूर जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्ष सर्वाधिक २३ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. हा जिल्हा पूर्वीपासूनच काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो आहे आणि आजही तो काँग्रेसचाच बालेकिल्ला असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. असे नमूद करून जिल्ह्यातील जनतेने भरघोस पाठिंबा आणि आशीर्वाद देत काँग्रेस पक्षावर व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी आणि माझे सर्व सहकारी प्रयत्नशील राहतील असे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निकालाच्या संदर्भाने प्रतिक्रिया व्यक्त करताना आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे की, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेब, आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब, आणि आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांचा जिल्हा म्हणून लातूर जिल्ह्याची राज्यात आणि देश पातळीवर ओळख आहे. या नेत्यांनी सुसंस्कृत आणि विकासाचे राजकारण करून लातूरला कायम पुढे नेण्याचे काम केले आहे. आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात आर्थिक सुबत्ता आणून विकास प्रक्रियेला गती देण्याचे काम आम्ही सुरू ठेवले आहे.

# देवणी तालुक्यात भाजपने मारली बाजी

## पंचायत समिती ताब्यात ठेवण्यात यश


**रामलिंग शेषेराव शेरे** जवळगा जि. प. गट


**सौ. उषाताई संभाजी पाटील,** वलांडी जि. प. गट


**औदुंबर रामदास पांचाळ,** बोरोळ जि. प. गट


**सौ. महादेवी शंकर पाटोळे,**जवळगा पं. स. गण


**सौ. महादेवी शंकर पाटोळे,**जवळगा पं. स. गण


**बाळू माधवराव पाटील,** वलांडी पं. स. गण


**सगर नागनाथ दत्तात्रय,** विळेगाव पं. स. गण


**बिरादार गजानन गोविंद,** बोरोळ पं. स. गण


**अश्विनी सुनिल हुंचनाळे,** तळेगाव पं. स. गण

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**

**वलांडी दि. १० फेब्रुवारी :** देवणी तालुक्यातील तीन जिल्हा परिषद व सहा पंचायत समितीसाठी सोमवारी (ता. ०९) शांततेत मतमोजणी झाली. तीन जिल्हा परिषद गटात दोन भाजपा तर एका गटात काँग्रेसने विजय मिळवला आहे. तर सहा पंचायत समिती गणात चार गण भाजपा तर एका गणात काँग्रेस व एका गणात राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळवला आहे.

तालुक्यातील जवळगा व वलांडी जिल्हा परिषद गट भाजपाने पुन्हा ताब्यात ठेवला तर बोरोळ गटात काँग्रेसने विजय मिळवला. वलांडी, जवळगा, दवणहिप्परगा, तळेगाव (भोगेश्र्वर) या चार गणात भाजपाने विजय मिळवला तर बोरोळ पंचायत समितीत राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार विजय मिळवला. विळेगाव पंचायत समिती गण काँग्रेसने ताब्यात घेतली आहे.

जवळगा जिल्हा परिषद गटामध्ये भाजपाने रामलिंग शेरे यांनी काँग्रेसचे विकास डगवाले यांचा पराभव करीत पुन्हा एकदा भाजपाला विजय मिळवुन दिला आहे. वलांडी जिल्हा परिषद गटात तळेगावकर कुटुंबीयांच्या उषा संभाजीराव पाटील तळेगावकर यांनी काँग्रेसच्या अंजली अजित बेळकोणे यांचा पराभव केला आहे. तर बोरोळ जिल्हा परिषद गटात काँग्रेसचे औदुंबर पांचाळ यांनी भाजपाचे धोंडीराज गुणाले यांचा पराभव करीत तालुक्यात एकमेव जागा राखण्यात यश मिळवले आहे.

पंचायत समितीच्या जवळगा गणामध्ये भाजपाच्या महादेवी पाटोळे यांनी काँग्रेसच्या सुरेखा सोनकांबळे यांचा पराभव केला आहे. तर दवणहिप्परगा पंचायत समिती गणामध्ये भाजपाच्या अंकिता पाटील यांनी काँग्रेसच्या प्रभावती पाटील यांचा पराभव करीत सत्ता कुंटुबातच ठेवण्यात यश मिळवले आहे. वलांडी पंचायत समिती गणात भाजपाचे बाळासाहेब पाटील यांनी काँग्रेसचे उमेश बिरादार यांचा पराभव केला आहे. विळेगाव गणात काँग्रेसचे नागनाथ सगर यांनी भाजपाचे विजयकुमार बोरोळ यांचा पराभव केला आहे. बोरोळ गणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन बिरादार (भोपणीकर) यांनी भाजपाचे प्रमोद पाटील यांचा पराभव केला आहे. बोरोळमध्ये जिल्हा परिषद गटामध्ये काँग्रेसने विजय मिळवला असला तरी पंचायत समिती गणामध्ये काँग्रेसचा उमेदवार तिसऱ्या स्थानावर राहिला आहे. तळेगाव पंचायत समिती गणामध्ये भाजपाच्या अश्र्विनी हंचनाळे यांनी काँग्रेसच्या प्रणीती चामले यांचा पराभव केला आहे. विजयी उमेदवारासह समर्थकांनी जल्लोष करीत विजय साजरा केला. जेसीबीच्या साह्याने गुलाल उधळुन आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला.

जवळगा जिल्हा परिषद गटात काँग्रेसच्या मातब्बर उमेदवारासमोर भाजपाच्या रामलिंग शेरे यांनी कडबी झुंज देत एकहाती विजय मिळवला. जवळगा गटातील लढतीकडे तालुक्यासह सिमावर्ती भागातील नागरीकांचे लक्ष लागले होते. मात्र सुरुवातीपासुनच विकासाच्या मुद्यावर प्रचारयंत्रणा सक्षम करीत गावपातळीवरील कार्यकर्त्यांचे पाठबळ मिळवत जोरदार मुंसडी मारली. काँग्रेस व भाजपाने दोन्ही उमेदवारा लिंगायत समाजातील व एकाच गावातील दिल्याने मोठी चुरस निर्मान झाली होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसने मराठा उमेदवार देत तिरगी लढत दिली होती. मात्र भाजपाच्या रामलिंग शेरे यांनी गेल्या दोन दशकात केलेल्या सामाजिक कामाचा निकालातुन प्रत्यय आला.

वलांडी जिल्हा परिषद गटात तळेगावकर विळेगावकर या दोन्ही पारंपारिक राजकीय विरोध घराण्यामध्ये पुन्हा एकदा चुरशीची लढत झाली. यात विद्यमान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजित बेळकोणे यांच्या पत्नी अंजली बेळकोणे यांचा पराभव करत भाजपाच्या उषाताई संभाजीराव पाटील तळेगावकर यांनी विजय मिळवीत तळेगावकर कुंटुबाला राजकीय बळ देण्यात यश मिळवले आहे. जिल्हा परिषदेत प्रवेश करण्यासाठी गेल्या अनेक निवडणुकीत पराभवाला सामोरे जाणाऱ्या तळेगावकर कुंटुबीयांना विजयाचा गुलाल लागला आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी असल्याने वलांडीच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. शिवाय तळेगावकर कुटबीयांचे खंदे समर्थक तथा पंचायत समिती सभापतीपदाचे एकमेव दावेदार बाळासाहेब पाटील यांनी निवडुन आणत पंचायत समितीचे सभापतीपद आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळवले आहे.

बोरोळ जिल्हा परिषद गटात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांचा खंदा समर्थक औंदुबर पांचाळ यांनी भाजपाच्या धोंडीराज गुणाले यांचा पराभव करीत तालुक्यात काँग्रेसचे खाते उघडले आहे. बोरोळ पंचायत समिती गणामध्ये गजानन भोपणीकर यांनी सुरुवातीपासुनच नियोजनबद्ध व अचुक प्रचारयंत्रणा राबवत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे.

# विद्यार्थ्यांसाठी अर्थसंकल्पावर म. गांधी महाविद्यालयात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १० फेब्रुवारी :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी सन २०२६-२०२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पातील तरतुदींची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या हेतूने येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. प्रकाश देशमुख यांचे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ या विषयावर विस्तृत व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार हे होते. प्रमुख व्याख्याते प्रकाश देशमुख यांनी तुटीचा अर्थसंकल्प, विशेष अर्थसंकल्प याविषयी



माहिती देऊन केंद्रीय अर्थसंकल्पातील शिक्षण, शेती, उद्योग, रोजगार अशा विविध घटकांच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा केली. अध्यक्षीय समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी डॉ. पी. कांबळे यांनी अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने आपले यथोचित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ राजेश्री जाधव यांनी केले. कार्यक्रमास भूगोल विभाग प्रमुख डॉ. नितीन देशमुख, प्रसिद्धी विभाग प्रमुख डॉ. यादव सूर्यवंशी, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बालाजी माकणे-पाटील, डॉ. राजेश जोंधळे, डॉ. एस. बी. साठे, श्री. सुधाकर कदम तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन मेकले प्रिती यांनी केले आभार गुळवे निखिल यांनी मानले.

## मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर : डॉ.शेषनाथ भोसले



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १० फेब्रुवारी :** क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान, शाश्र्वत ऊर्जा आणि नॅनोतंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत मोठी क्रांती होत आहे. अत्याधुनिक संशोधनाचा वापर आधुनिक पद्धतीने झाला पाहिजे. मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही काळाची गरज आहे असे उद्गार केंद्रीय विद्यापीठ गुलबर्गा कर्नाटक येथील रसायनशास्त्राचे डॉ.शेषनाथ भोसले यांनी काढले. छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात विज्ञान शाखेने आयोजित केलेल्या मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनातील उदयोन्मुख कल या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रावेळी ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, उद्घाटक म्हणून स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजाराम माने, प्रमुख उपस्थिती किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी टी शिंदे, सहसचिव हिरागिर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, डॉ.अंबादास कदम, डॉ.शिंदे एस.एल.,डॉ. सोनवणे आर. एस., पृथ्वीराज पाटील, पुंडलिकराव पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम.मांजरे, आयक्वेशीचे समन्वयक डॉ.विष्णू पवार यांची होती.

यावेळी विविध संशोधकाच्या शोधनिबंधाचे युनिव्हर्सल रिसर्च ॲनालिसिस जर्नल या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य डॉ.मांजरे यांनी महाविद्यालयाच्या उभारणीपासून आजपर्यंतचा इतिहास आणि महाविद्यालयाने ए प्लस ग्रेड घेतलेल्या सर्व घडामोडीचा वृत्तांत मांडला.

पुढे बोलताना डॉ.भोसले म्हणाले, विद्यार्थ्यांनी मेहनत करावी. संशोधनामध्ये वेळ द्यावा. त्याशिवाय प्रगती होत नाही. तर उद्घाटक डॉ.राजाराम माने म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नवीन गोष्टी घेऊन आलेले आहे.अध्यापक आणि विद्यार्थ्यासाठी या गोष्टी आव्हानात्मक आहेत. सर्वांनी अभ्यासपूर्वक त्याची अंमलबजावणी करावी. अध्यक्षीय समारोप अध्यक्षाच्या वतीने पृथ्वीराज पाटील यांनी केला. त्यावेळी ते म्हणाले,

सध्या विद्यार्थ्यांनी एआयचा वापर करावा. विद्यार्थ्यांचा कल जटील समस्या सोडवणे, नवीन साहित्य निर्मिती आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाद्वारे व्यावहारिक उपाय शोधण्यावर केंद्रित असावा असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.उर्मिला शिरसे, डॉ.व्ही. के.भालेराव यांनी तर प्रास्ताविक डॉ. एच.ए.तिरपुडे यांनी आणि आभार डॉ. विष्णू पवार यांनी मानले. कार्यक्रमाला विविध महाविद्यालयातून आलेले संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पानगाव जि.प आणि पंचायत समित महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा विजय

**तभा वृत्तसेवा**

**पानगाव, दि. १० फेब्रुवारी :** रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे चार जि. प. आणि ८ पं. स. च्या निवडणूकीसाठीआज I ७ फेब्रुवारी रोजी मतदान पार पडले होते आज सोमवार ९ फेब्रुवारी रोजी निकाल लागला सकाळ १० वाजल्यापासून I रेणापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे १६ टेबल वर ११ फेऱ्या मत मोजणी सरू झाली सकाळी पहिल्या फेरी पासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार आघाडी वर दिसून येत होते. पानगाव जिल्हा परिषद साठी डॉ सुनील नागरगोजे तर पानगाव पंचायत समिती च्या श्रीदेवी गालफाडे तर कोष्टगाव पंचायत समिती मध्ये मोनिका सर्यवंशी विजयी झाल्या तालुक्यातील हा गणाची स्व गोपीनाथ मुंढे साहेबाचा मतदार संघ म्हणून ओळख होती आता पर्यत भारतीय जनता पार्टी ची सत्ता असलेल्या मतदार संघा मध्ये पहिल्यादाच महाराष्ट्रनवनिर्माण सेनेनला यश प्राप्त झाले त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्ते मध्ये आनंद आहे शेतकऱ्या विविध च्या प्रशांनावर नेहमी अग्रेसर असेल शेतकरी नेते म्हणून ओळख असलेल्या संतोष नागरगोजे यांच्या मार्गदर्शना खाली ही निवडणुकीला महाराष्ट्र नवनिर्माण सेना सामोरी गेली होती

संतोष नागरगोजे यांनी केलेल्या कामाच्या जीवावर आम्ही ही निवडणूक लढवत आहोत अत्यंत आटीतटी निवडणुकी मनसे हा विजय प्राप्त केला आहे. तालुक्यातील सर्वात मोठे सर्कल म्हणून ओळख असलेल्या पानगाव सर्कल मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अभूतपूर्व यश मिळाल्या मुळे कार्यकर्ते आनंदी आहेत

शेतकरी नेते कोणतेही पद किंवा कोणतीही सत्ता नसताना केवळ गोर गरीबाच्या केलेल्या कामावर प्रचार केला होता आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केलेल काम घेऊन मतदारा समोर जात होते

पानगांव जिल्हा परिषद गटात मनसेचे जिल्हा परिषद व पंचायत समितीचे एकूण तीन उमेदवार विजयी .

रेणापूर तालुक्यातील पानगाव जिल्हा परिषद गणात प्रस्थापितांना धक्का देत मनसेने बाजी मारल्याचे दिसून येत आहे .मनसे सरचिटणीस संतोष भाऊ नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेसाठी उभे असलेले सुनील गणपतराव नागरगोजे हे ३१९१ मतानी विजयी झाले असून .पानगाव पंचायत समिती गणातून श्रीदेवी प्रकाश गालफाडे ह्या११०० झाल्या आहेत .कोष्टगांव गाव गणातून सौ मोनिका रवि सुर्यवशी ह्य २८० मतांनी विजयी झालेल्या आहेत .सर्व विजयी उमेदवाराचे सर्कलमधील सर्व मतदाराने ढोल ताशाच्या गजरात मिरवणुकीने आनंद व्यक्त केला आहे .

# चाकूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हा परिषद चार तर पंचायत समितीत आठ जागेवर विजय

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. १० फेब्रुवारी :** चाकूर तालूक्यातील पाच जिल्हा परिषद व दहा पंचायत समितीच्या निवडणुकीची मतमोजणी पुर्ण झाली असून सर्व जागेचे निकाल हाती आली आहेत.जिल्हा परिषद मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चार व भाजपने एका जागेवर विजय मिळविला असून पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आठ जागेवर विजय मिळवित राष्ट्रवादी काँग्रेसने चाकूर तालुक्यात एकहाती सत्ता मिळवली आहे.

चाकूर येथील तहसील कार्यालयात निवडणुक निर्णय अधिकारी संगिता टकले, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी नरसिंग जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी करण्यात आली, निवडणुकीत ६७ टक्के मतदान






झाले होते.सकाळी दहा वाजता मतमोजणी सुरू झाली सुरवातीला टपाली मतदानाची मोजणी करण्यात आली.दहा टेबलवर सर्वच गटाच्या मतमोजणीला एकाच वेळी सुरूवात करण्यात आली.हळुहळू निकाल स्पष्ट होऊ लागले आणि जिल्हा परिषद व पंचायत समितीत राष्ट्रवादी (अजित पवार)चाकूर तालुक्यात एक नंबरचा पक्ष ठरला आहे.

विजयी झालेले उमेदवार पुढील प्रमाणे जिल्हा परिषद गट नळेगाव -

रोहिणा- उषा सोनकांबळे मिळालेली मते ९८६० (राष्ट्रवादी काँग्रेस), वडवळ नागनाथ - भानुदास पोटे ९२४८ मते (राष्ट्रवादी काँग्रेस), चापोली - रंजना चाटे १००५७ मते (राष्ट्रवादी काँग्रेस), जानवळ - दयानंद सुरवसे ६९०७ (राष्ट्रवादी काँग्रेस), नळेगाव अमर पाटील ८१२९ मते (भाजप) हे विजयी झाले आहेत. पंचायत समितीच्या दहा गणात नळेगाव- शिवम देवशेटवार ५३०६ (भाजप), सुगाव - भुजंग शिंदे ३६४२ (राष्ट्रवादी काँग्रेस), जानवळ -सावित्रीबाई केदार २८६७ (राष्ट्रवादी काँग्रेस), झरी - मनिषा जाधव ३७१२ (राष्ट्रवादी काँग्रेस), वडवळ नागनाथ मिरावती कसबे ५३८८ ( राष्ट्रवादी काँग्रेस), आष्टा विजयमाला शेळके ३८१८ (भाजप), चापोली - गजानन होनराव ३३०२ (राष्ट्रवादी काँग्रेस), अजनसोंडा -सुप्रिया हाके ४६३२ (राष्ट्रवादी कॉग्रेस), रोहिणा - जयश्री नागरगोजे ५२२५ (राष्ट्रवादी काँग्रेस), आटोळा - संतोष कलवले ५४९२ मते (राष्ट्रवादी काँग्रेस) घेऊन विजयी झाले आहेत. विजयी उमेदवार यांना निवडणूक निर्णय अधिकारी संगिता टकले यांनी प्रमाणपत्र देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण करीत पेढे भरवून फटाक्यांच्या अतिशबाजी करून ढोल ताशांच्या गजरात विजयी जल्लोष साजरा केला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### १२ फेब्रुवारी रोजी विमा कामगार संघटनेचा देशव्यापी संप

सेलूतील एलआयसी कर्मचारीही संपात सहभागी होणार

**परभणी,/प्रतिनिधी :** अन्यायकारक कामगार संहिता, विमा उद्योगात थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय) १०० टक्के करण्याचा निर्णय, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचे विनिवेश तसेच व्यवस्थापनाच्या एकतर्फी भूमिकेच्या विरोधात भारतीय आयुर्विमा महामंडळातील (एलआयसी) विमा कामगार संघटनेद्वारे गुरुवार १२ फेब्रुवारी रोजी एक दिवशीय संप पुकारण्यात आला आहे.

ऑल इंडिया इन्शुरन्स एम्प्लॉइज असोसिएशनच्या आवाहनानुसार हा देशव्यापी संप होत असून सेलू येथील भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या विमा कामगार संघटनेचे कर्मचारीही या संपात सक्रिय सहभाग नोंदवणार आहेत. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळात मध्यमवर्गीय लिपिक संवर्गात तात्काळ भरती करणे, १९९५ ची पेन्शन योजना सर्व एलआयसी कर्मचाऱ्यांना लागू करणे, कर्मचाऱ्यांचे सर्व प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवणे तसेच उद्योग व कर्मचारी प्रश्नांवर युनियनसोबत सुसंगत व सन्मानपूर्वक संवाद साधणे यांचा समावेश आहे.

या मागण्यांकडे शासन व व्यवस्थापनाने दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ हा संप पुकारण्यात आला असून या देशव्यापी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कॉम. राजेश भालेराव, कॉम. शमशोदिन शेख आणि कॉम. रामा धोतरे यांनी केले आहे.

### बाल विद्या फाऊंडेशनच्या श्रुती विभुतेचे होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या दुसऱ्या फेरीत यश

**परभणी,/प्रतिनिधी :** बाल विद्या फाऊंडेशनच्या इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी कु. श्रुती गजानन विभुते हिने होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या दुसऱ्या फेरीत यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल तसेच एसओएफ ऑलिम्पियाड परीक्षेत दुसऱ्या फेरीस पात्र ठरलेल्या व सुवर्णपदक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या गौरवार्थ बाल विद्या फाऊंडेशनतर्फे भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. विवेक नावंदर यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी बाल विद्यामंदिर हायस्कूलचे मुख्याध्यापक अरुण बोराडे, बाल विद्याविहार प्रशालेचे विभाग प्रमुख नितीन गोराडकर, बाल विद्यावर्धिनी इंग्लिश स्कूलचे प्रिन्सिपल राजेश कापसे तसेच बाल विद्या फाऊंडेशनचे व्यवस्थापक सुनिल घुगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना डॉ. विवेक नावंदर म्हणाले की, बाल विद्या फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांचे यावर्षीचे यश अत्यंत उल्लेखनीय आहे. पहिलीपासून बारावीपर्यंत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. बारावीनंतर मेडिकल व इंजिनिअरिंगसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा यासाठी नीट व जेईई सारख्या परीक्षांची तयारी करून देणारा सक्षम प्लॅटफॉर्म संस्थेतर्फे उपलब्ध करून दिला जाणार आहे.

ते पुढे म्हणाले की, बाल विद्या फाऊंडेशनमध्ये प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक ठेवण्यासाठी स्वतंत्र प्रवेश समिती स्थापन करण्यात येईल. अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यात येईल तसेच अभ्यासाची आवड असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाईल. पालक व शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मोठे कष्ट घेत असतात, याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवून सातत्याने परिश्रम घ्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

### चेन्नई-नगरसोल-चेन्नई रेल्वेगाड्यांना तात्पुरते अतिरिक्त डबे

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता तसेच वेटिंग यादीतील प्रवाशांना अधिक प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी चेन्नई-नगरसोल-चेन्नई या रेल्वेगाड्यांना तात्पुरत्या स्वरूपात अतिरिक्त डबे वाढविण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे.

त्यानुसार, गाडी क्र. १६००३ चेन्नई-नगरसोल या गाडीला ८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत तृतीय श्रेणी वातानुकूलित (३-सी) चे २ अतिरिक्त डबे जोडण्यात येणार आहेत. तर गाडी क्र. १६००४ नगरसोल-चेन्नई या गाडीला ९ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत तृतीय श्रेणी वातानुकूलित (३-सी) चे २ अतिरिक्त डबे वाढविण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे प्रवाशांना अधिक आसन क्षमता उपलब्ध होणार असून गर्दी कमी होण्यास मदत होईल. प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाने ही महत्त्वाची कार्यवाही हाती घेतली आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

### रंगगंध कलासक्त न्यासच्या अभिवाचन स्पर्धेत 'संवाद संगीतांजली' सर्वप्रथम; अंतिम फेरीसाठी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** रंगगंध कलासक्त न्यास, चाळीसगाव आणि ट्रान्स डेल्टा फाउंडेशन, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पूज्य पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती अभिवाचन स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत राजीव गांधी युवा फोरम, परभणी या संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या 'संवाद संगीतांजली' या अभिवाचनाने प्रथम क्रमांक पटकावला असून अंतिम फेरीसाठी त्याची निवड करण्यात आली आहे.

ही प्राथमिक फेरी ७ फेब्रुवारी रोजी मृदगंध हॉल, सिडको चौक, औरंगाबाद येथे पार पडली. रविशंकर झिंगरे लिखित व किशोर पुराणिक दिग्दर्शित 'संवाद संगीतांजली' या संहितेच्या सादरीकरणात रविशंकर झिंगरे, किशोर पुराणिक आणि श्रीकांत देशपांडे यांचा सहभाग होता. या अभिवाचनात गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या मूळ बंगाली व इंग्रजी कवितांचे मराठी अनुवादन करून त्यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर या स्पर्धेच्या प्राथमिक फेऱ्या आयोजित करण्यात आल्या होत्या. प्रत्येक केंद्रातून प्रथम क्रमांक व विशेष गुण प्राप्त करणाऱ्या संघाची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात येते. या स्पर्धेची अंतिम फेरी २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी चाळीसगाव येथे रंगणार आहे.

दरम्यान, या स्पर्धेत स्नेहल पुराणिक दिग्दर्शित आणि अरुणा ढेरे यांच्या काव्यप्रतिभेचा आस्वाद देणाऱ्या पुन्हा नव्याने या संहितेचे अभिवाचन बालगंधर्व सांस्कृतिक कला क्रीडा व युवक मंडळ या संस्थेच्या माध्यमातून क्रांती दैठणकर आणि सुषमा कुलकर्णी यांनी सादर केले. या सादरीकरणासाठी क्रांती दैठणकर यांना वाचिक अभिनयाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. या स्पर्धेत सहभागी होऊन पारितोषिक विजेते ठरलेल्या सर्व कलावंतांचे संस्थेचे अध्यक्ष संजय पांडे यांनी अभिनंदन केले.

# आता नखातेची तिसरी पिढी आलीराजकारणात





**मोहन धारासूरकर**

**पाथरी,/प्रतिनिधी :** माजी मंत्री स्वर्गीय स गो नखाते यांनी काँग्रेसच्या काळामध्ये मंत्रीपद भूषवले होते यानंतर त्यांचे पुत्र अनिल नखाते हे देखील राजकारणामध्ये यशस्वी झाले आहेत तर आता त्यांचे पुत्र अजिंक्य नखाते हे हदगाव जिल्हा परिषद सर्कल मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडून आले आहेत यामुळे नखाते यांची तिसरी पिढी राजकारणात आली आहे.

स गो नखाते यांची राजकीय कारकीर्द अतिशय सुंदर होते त्यांचा एक प्रकारे राजकारणात दरारा होता तो काळ काही वेगळाच होता परंतु त्यानंतर अनिल नखाते यांनी शैक्षणिक क्षेत्रात व राजकारणात आपला दबदबा निर्माण केला होता व त्यांच्या सुविद्ध पत्नी भावनाताई नखाते यांनी देखील जिल्हा परिषदेमध्ये सभापती पद भूषवले होते असे असताना अनिलदाखते यांनी आप ला पुत्र अजिंक्य नखाते यांना हदगाव जिल्हा परिषद सर्कल मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे तिकिटावर उभे केले अतिथटीच्या झालेल्या सामन्यात अजिंक्य नखाते हे अजिंक्य ठरले अनिल लखाते यांनी घेतलेला हा निर्णय सार्थ ठरला आहे आता अजिंक्य नखाते यांनी राजकारणामध्ये नव्यानेच इंट्री घेतल्याने येथून पुढे तरुणांना सोबत घेऊन ते वाटचाल करतील अशी आशा पाथरी व हदगाव परिसरातील मतदारांना लागली आहे.



## आडगांव जि. प. गटातून डॉ कऱ्हाळे तर पं. स. गणातून भाजपाचे दाभाडे व सांगळे विजयी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक-२०२६ च्या निवडणुकीत अत्यंत प्रतिष्ठेच्या व महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या आमच्या आडगांव जिल्हा परिषद गटातून भारतीय जनता पक्षाचे लोकप्रिय उमेदवार डॉ देवराव गंगारामजी कऱ्हाळे साहेब विजयी.

आडगांव पंचायत समिती गणातून अटी-तटीच्या लढतीत, सर्वच राजकीय धुरंधरांचे व तज्ञ राजकीय विश्लेषकांचे अंदाज बाजूला सारून, आमचे ज्येष्ठ नेते आदरणीय श्री प्रकाशरावजी दाभाडे पाटील यांच्या स्नुषा व भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रिय उमेदवार सौ अश्विनीताई बाळासाहेब दाभाडे विजयी झाल्या आहेत. त्याचबरोबर आमच्या आडगांव जिल्हा परिषद गटातील दुसरा पंचायत समिती गण असलेल्या इटोली पंचायत समिती गणातून मौजे इटोली येथील भारतीय जनता पक्षाचे धडाडीचे कार्यकर्ते श्री बालाजी सांगळे यांच्या सुविद्य पत्नी सौ रंजनाई बालाजी सांगळे ह्या विजयी झालेल्या आहेत. परभणी जिल्ह्याचे लोकनेते आदरणीय श्री रामप्रसादजी बोर्डीकर साहेबांच्या मार्गदर्शनात व राज्यमंत्री नामदार सौ मेघनाताई साकोरेजी बोर्डीकर यांच्या नेतृत्वात लढल्या गेलेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला आपले अमुल्य मत देऊन विजयी करणाऱ्या सर्व सन्माननीय मतदार बंधू भगिनींचे नामदार सौ मेघनाताई बोर्डीकर यांनीही आभार मानले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या सर्व विजयी उमेदवारांचे मनापासून अभिनंदन तसेच सन-२०२६ च्या या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आपल्या जिवाचे रान करून प्रचंड मेहनत व अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचेच त्यांनी आभार मानले आहेत. आडगांव जिल्हा परिषद गटातील व आडगांव पंचायत समिती गणातील भारतीय जनता पक्षाचे सर्व सन्माननीय शक्ति केंद प्रमुख, बुथ प्रमुख व सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांचे नवनिर्वाचित सदस्या सौ दाभाडे यांनी आभार मानले आहेत.

## जिल्हाधिकारी यांनी केली परीक्षा केंद्राची पाहणी



**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्हयात आजपासून बारावीच्या परिक्षांना सुरुवात झाली आहे. कॉपीमुक्त वातावरणात परिक्षा होण्यासाठी प्रशासनासह शिक्षण व पोलीस विभागाने आवश्यक त्या उपयोजना केल्या आहेत. परिक्षांच्या वर्गखोल्यात सीसी टिव्ही कॅमेऱ्यांची नजर विद्यार्थ्यांवर राहणार आहे. आज स्वत: जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी परभणी शहरातील परिक्षा केंद्रांना भेट देऊन पाहणी केली. श्री शिवाजी महाविद्यालयात पाहणी करताना जिल्हाधिकारी दिसत आहेत.

## संत भगवानबाबा उच्च माध्यमिक आश्रमशाळेत इयत्ता बारावी परीक्षेस सुरुवात



**जिंतूर,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर द्वारा आयोजित इयत्ता बारावी परीक्षेस आज दिनांक १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात झाली आहे.

संत भगवानबाबा उच्च माध्यमिक आश्रमशाळा इटोली ता.जिंतूर (केंद्र क्रमांक ०६७४) या परीक्षा केंद्रावर आज प्रथम दिवशी परीक्षेला येणाऱ्या परीक्षार्थींचे गुलाब पुष्पदेऊन स्वागत करण्यात आले. तसेच परीक्षेचे पर्यवेक्षण करणाऱ्या सर्व पर्यवेक्षकांचे, बैठे पथक व इतर कर्मचारी आदींचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या परीक्षा केंद्रावर एकूण २९२ परीक्षार्थी प्रविष्ट झाले आहेत. आज इंग्रजी या विषयाचा पेपर घेण्यात आला.परीक्षा अत्यंत नियोजनबद्ध व कुठलाही गैर प्रकार न घडता पार पडली. सदरील परीक्षा केंद्रप्रमुख श्री रमेश दराडे प्राचार्य संत भगवानबाबा माध्य व उच्च माध्य आश्रमशाळा इटोली यांच्या नियंत्रणात सुरू आहेत. परीक्षा केंद्रावरील सर्व दालनामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत तसेच प्रत्येक वर्ग खोलीमध्ये पंखे व दिव्याची उत्तम व्यवस्था करण्यात आलेली आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर ची सुविधा उपलब्ध आहे. परीक्षेकरता बैठे पथकामध्ये श्री मेनकुदळे सर, श्री चोले सर व श्रीमती नागरगोजे मॅडम हे कर्मचारी उपस्थित होते. पोलीस पथकामध्ये श्री आडे साहेब व श्री राठोड साहेब उपस्थित होते. सदरील परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेची देवान-घेवाण करण्यासाठी परीक्षा मंडळाकडून रनर म्हणून श्री कदम सर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकार्य करीत आहेत.

## जिंतूर तालुक्यातील भोगाव देवी येथे प.पू. माधवानंद महाराज यांच्या उपस्थितीत 'महाशिवरात्र महोत्सव

**जिंतूर,/प्रतिनिधी-** चिन्मयमूर्ती संस्थान, उमरखेडचे मठाधिपती प.पू. माधवानंद महाराज यांच्या पावन उपस्थितीत यंदाचा 'महाशिवरात्र महोत्सव - २०२६' परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील भोगाव देवी येथे मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. प.पू. माधवानंद महाराज यांचे गुरु वामनानंद स्वामी यांच्या प्रेरणेने प्रथमच हा महोत्सव भोगाव देवी येथे आयोजित करण्यात आला आहे.

तीन दिवसीय कार्यक्रमाची रूपरेषा:हा महोत्सव शनिवार, दि. १४ फेब्रुवारी ते सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपन्न होईल. शनिवार, १४ फेब्रुवारी: दुपारी ४:०० वाजता महाराजांचे आगमन व भव्य शोभायात्रा काढण्यात येईल. रविवार, १५ फेब्रुवारी: सकाळी ७:०० वाजता पुण्यहवाचन व महारुद्राभिषेक होईल. त्यानंतर दुपारी १२:१५, संध्याकाळी ६:०० आणि रात्री १२:०० वाजता विश्वंभर लिंगदर्शनाचे कार्यक्रम पार पडतील. सोमवार, १६ फेब्रुवारी: सकाळी ९:०० वाजता लघुरुद्राभिषेक होईल. दुपारी १२:०० आणि संध्याकाळी ६:०० वाजता भाविकांना विश्वंभर लिंगदर्शनाचा लाभ घेता येईल.

स्थळ आणि आयोजक: हा सोहळा भोगाव देवी मंदिर, ता. जिंतूर, जि. परभणी येथे पार पडणार आहे. जिंतूर-औंढा रोडवर हे गाव वसलेले आहे. या महोत्सवाचे आयोजन 'भोगावकर शिष्यवृंद परिवारा'च्या वतीने करण्यात आले आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी आणि शिष्यांनी या मंगल प्रसंगी उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



प.पू. माधवानंद महाराज हे उमरखेड (जि. यवतमाळ) येथील चिन्मयमूर्ती संस्थानचे विद्यमान मठाधिपती आहेत. अध्यात्म आणि समाजसेवा या दोन्ही क्षेत्रांत त्यांचे कार्य मोठे आहे. महाराज हे प.पू. वामनानंद स्वामी यांचे शिष्य आहेत. त्यांनी आपल्या गुरूंनी दाखवलेल्या भक्तीच्या मार्गावर चालत अध्यात्माचा प्रसार केला आहे. समाजाला नैतिक आणि सात्विक जीवन जगण्याची दिशा देण्यासाठी महाराज विविध ठिकाणी जाऊन भक्तांना भक्तिमार्गाचा उपदेश देतात महाशिवरात्री, गुरुपौर्णिमा यासह विविध धार्मिक कार्यक्रम ते मोठ्या उत्साहात साजरे करतात.ते प्रथमच भोगाव देवी (जि. परभणी) येथे महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन करून आपल्या कार्याची व्याप्ती वाढवत आहेत.

तरुण पिढीमध्ये संस्कार रुजवण्यासाठी आणि व्यसनमुक्तीसाठी ते आपल्या कार्यातून सातत्याने प्रयत्नशील असतात.

चिन्मयमूर्ती संस्थान, उमरखेड हे संस्थान उमरखेड परिसरातील एक अत्यंत जागृत आणि श्रद्धास्थान मानले जाते. केवळ पूजा-अर्चा न करता, हे संस्थान दुष्काळग्रस्त काळात मदत, गरजू विद्यार्थ्यांना संस्कृत पाठशाळा , शिक्षण आरोग्य अशा सामाजिक कार्यातही सक्रिय असते. महाराजांचा शिष्य परिवार खूप मोठा आणि विखुरलेला आहे.



## आडगांव पंचायत समिती गगणातून अटी-तटीच्या लढतीत भाजपच्या सौ दाभाडे विजयी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** आमच्या आडगांव पंचायत समिती गणातील भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार सौ अश्विनीताई बाळासाहेब दाभाडे ह्या आडगांव पंचायत समिती गणातून अधिकृतरित्या विजयी झाल्याबाबतचे प्रमाणपत्र आज माननीय श्री शैलेशजी लाहोटी साहेब निवडणुक निर्णय अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक सन-२०२६ जिंतूर जि परभणी यांचेकडून आज प्रदान करण्यात आले...

यावेळेस उपस्थित नायब तहसीलदार मा श्री प्रशांतजी राखे सर, आमच्या आडगांव पंचायत गणातील विजयी उमेदवार सौ अश्विनीताई बाळासाहेब दाभाडे, श्री विनायकरावजी दाभाडे (चेअरमन), श्री मंचकरावजी खंडागळे (माजी सरपंच) विश्वनाथ राऊत, गणेशराव दाभाडे, शामराव खाडप, पवन दाभाडे पाटील, काशिनाथ राऊत, जगनराव दाभाडे, विश्वांबर खंडागळे, वैजनाथ दाभाडे पाटील व सर्व सहकारी बांधव आवर्जून उपस्थित होते...

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक सन-२०२६ या निवडणूकीत आम्हांस सहकार्य व मदत करणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या सर्व शक्ति केंद्र प्रमुख, बुथ प्रमुख, सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, सहकारी बांधवांचे मनापासून आभार तसेच या निवडणूकीत आम्हांस प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या सहकार्य करणाऱ्या सर्व सन्माननीय सहकारी बांधवांसह सन्माननीय मतदार बंधू भगिनींचे मनापासून आभार मानले.

# जि.प.पेठशिवणी गटामध्ये भाजपाच्या मुरकूटे यांनी मारली बाजी






**पालम,/प्रतिनिधी:** पालम तहसील मध्ये सकाळी दहा वाजल्या पासून मतदानाला सुरुवात झाली यामध्ये सुरुवातीस पोस्टेल मते घेण्यात आली त्या नंतर सुरुवातीला जि परिषद रावराजूर सर्केलची मतमोजणी सुरुवात करण्यात आली त्या मध्ये उमेदवार मंगलाबाई गणेशराव रोकडे हे मशाल चिन्हावर ८३४३ मतांनी अधिव्यान निवडणु आले त्यांची ही पालम मध्ये अतिषबाजीत मिरवणुक काढण्यात आलीत्या नंतर पेठशिवणी जि प गणातून सौ सविताताई संतोष भाऊ मुरकटे यांनी एकुण मते १०८३५या गटातून जोरात कमळ फुलविले त्यांमुळे पेठशिवणी येथे फटाव्याच्या अतिष बाजी मध्ये भव्यदिव्य असी मिरवणुक काढण्यात आली.

जसे जोरात कमळ फुलले तसेच पेठीशपणी जि परिषेदया गटातील जनतेची सेवा करण्या साठी मला निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी केले त्या जलतेचे ऋण कधी ही विसरणार नाही नाही गटातील सर्व सामान्याची कामे करण्यासाठी मला संधी मिळाली आहे तसेच बनवस सर्कल मधून जि प गटातून शांतिस्वरूप सुरेशराव जाधव हे पण आपल्या कमळ हाति घेवून त्यांना ए मते५८०४ प्रचंड मतांनी विजयी झाले तर चारोटी जि प मधून अमित मोहन घनदाट यांनी पण चांगल्या प्रकारे कमळ फुलविले त्यांनी ९२६८ मतांनी विजयी झाले मतमोजणी तहसिल मध्ये मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता पालम पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शेषेराव खटाणे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# 'प्रपोगंडा' आणि 'परसेप्शन'च्या पलीकडे

समाजाला संघटित करण्याचे काम वेळखाऊ आहे. ते झोकून देऊनच करावे लागते. हा फावल्या वेळेतील उद्योग नाही हे ज्याला कळले, त्याला संघकार्य समजले असा स्पष्ट संदेश संघकार्याशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या मनात व्रतस्थ भावनेतून रुजलेला असतो. संघकार्य आणि समाजसेवा यामधील अंतर या भावनेमुळे स्पष्ट होते. आजकाल समाजसेवा हा पूर्णवेळ व्यवसाय मानला जातो. त्यासाठी विशेष प्रशिक्षण घ्यावे लागते, पदव्या प्राप्त केल्या की समाजसेवक म्हणून 'पात्रता' प्राप्त होते, पण अशी समाजसेवा हा कदाचित उपजीविकेचा उद्योग असू शकतो. व्रतस्थ भावनेने समाजसेवा करावयाची असेल, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नावाच्या संघटनेच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा सखोल अभ्यास करावयास हवा. संघ ही समाजसेवा 'शिकविणारी' संस्था नसून सेवेचा संस्कार 'घडविणारी' संघटना आहे, याची खात्री पटल्यानंतर संघकार्याचे समाजजीवनातील महत्त्व स्पष्ट होते. संघाच्या शताब्दीनिमित्त मुंबईत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या 'संघप्रवासाची १०० वर्षे- नवे क्षितिज' या संवाद व्याख्यानमालेचे मुंबईतील तिसरे दोन दिवसांचे सत्र ज्यांनी अनुभवले, त्यांना संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीची, संघविचारांची आणि संघसंस्कारांची ओळख करून घेण्यास मोठी मदत झाली असेल. आपल्याला संघ समजला असे मानणाऱ्यांनाही संघ संपूर्ण समजलेला नसतो, अशा स्थितीत, संघाविषयी प्रामाणिकपणे काही जाणून घ्यायचे असेल, तर संघकार्यात सहभागी होऊनच अनुभव घ्यावा लागेल. गेल्या शंभर वर्षांत संघाने देशात काय केले, हे जाणून घेण्याची उत्सुकता आता समाजात वाढत असताना, सरसंघचालकांच्या संवादात्मक व्याख्यानमालेतून अनेकांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे नेमकी उलगडत गेली आहेत. संघ हा राजकीय पक्ष नाही, त्यामुळेच, ही संघटना कोण्या एका राजकीय पक्षाचे काम करण्यासाठी स्थापन झालेली नाही. बऱ्याचदा संघाविषयीचा हा गैरसमज हेतुतः पसरविला जातो. संघ म्हणजे नेमके काय आहे, हे जाणून घ्यायचे असेल, तर, संघ म्हणजे नेमके काय नाही, हे समजून घेणे आवश्यक आहे. सरसंघचालकांच्या या संवाद कार्यक्रमातून संघ म्हणजे नेमके काय नाही, याचीही उत्तरे मिळून गेल्याने, संघाविषयी वाद-प्रवाद पसरवून नाहक समाजात संभ्रम माजविण्याचे राजकीय डावपेचदेखील यापुढे फारसे प्रभावी ठरणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. देशात आजवर अनेक चांगली कामे झालीत. यापुढेही ती होत राहतील. ती सर्व कामे एकट्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने केली असे नाही. चांगली कामे करणाऱ्या अनेक व्यक्ती, संस्था, संघटनांनी या देशाला सत्कार्याचे संस्कार दिले आहेत. ही चांगली कामे अखंडपणे पुढे चालत राहावी आणि व्यवस्थितपणे पूर्ण व्हावीत यासाठी अन्य कोणाशीही स्पर्धा न करता, कोणाचाही विरोध न करता, देशासाठी काम करणाऱ्या संघटनेचे नेमके रूप, कार्य आणि उद्दिष्ट शतकपूर्तीच्या निमित्ताने समाजासमोर आले आहे. सरसंघचालकांची ही व्याख्यानमाला म्हणजे केवळ संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा आढावा नव्हता आणि संघकार्याची ओळख समाजाला करून देण्याचा प्रचारकी कार्यक्रमही नव्हता. भारताच्या अनेक शतकांच्या इतिहासाची, सामाजिकतेची, संस्कृतीची आणि परंपरेच्या वारशाची ओळख करून देताना, हाच वारसा सोबत घेऊन भारताच्या भविष्याच्या वाटचालीची दिशा ठरविणाऱ्या विचारांची देवाणघेवाण होती. नवी दिल्ली, बंगळुरू, कोलकाता या महानगरांपाठोपाठ सरसंघचालकांच्या उद्बोधन मालिकेचे अखेरचे सत्र मुंबईत पार पडले आणि संघाच्या वाटचालीसोबतच, देशाच्या भविष्याविषयीची संघदृष्टीदेखील स्पष्ट झाली आहे. संघाच्या प्रेरणेतून सुरू असलेल्या एक लाख ३० हजारांहून अधिक सेवाकार्यातून संघाने ही वाटचाल निःसंदिग्धपणे आचरणातही आणली आहे, हेदेखील या संवादातून स्पष्ट झाले आहे. जे जे देशहिताचे, देशासाठी चांगले, ते काम करत राहणे हा सरसंघचालकांच्या शब्दांतील संघविचार मोजक्या शब्दांतील असला, तरी त्यातील नेमकेपणा मात्र, शंभर वर्षांच्या वाटचालीची आणि भविष्यातील निर्धाराची व्यापक ओळख करून देतो. दोन दिवसांच्या या सत्रामध्ये श्रोता या नात्याने सहभागी झालेल्यांना संघकार्याची गरज नेमकी स्पष्ट व्हावी, यासाठी सरसंघचालकांचे हे उद्बोधन महत्त्वाचे ठरले आहे.

हा देश ज्ञान, विज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीवर असेल, आर्थिकदृष्ट्या संपन्न असेल आणि कोणत्याही परकीय आक्रमणास समर्थपणे परतवून लावण्याच्या शक्तिसंपन्नतेने अजिंक्य ठरेल, ही संघाची धारणा आहे. असा देश घडविणे हे संघकार्य आहे, ही संघाच्या कार्यकर्त्यास मिळणारी शिकवण आहे. भारत हा केवळ भौगोलिक सीमांनी जखडलेला एक भूभाग नाही, तर या देशाला संस्कृतीचा वारसा आहे, इथल्या जनजीवनाला विचारांची बैठक आहे आणि इथल्या जीवनशैलीचे एक वेगळेपण आहे. संस्कृती, समाजगट, उपासनापद्धती आणि भाषा, यामध्ये प्रांतशः भेद असूनही ही जीवनशैली एकात्म आहे. ही एकात्मता म्हणजे भारताचे राष्ट्रजीवन आहे आणि ते समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रतिबिंबित होईल असा समाज निर्माण करणे हे संघाचे ध्येय आहे. कारण, कोणत्याही राष्ट्राचे श्रेष्ठत्व, तेथील समाज किती सुसंस्कृत, शक्तिशाली आणि वैचारिकदृष्ट्या संपन्न आहे, यावर निर्भर होत असते. अशा समाजनिर्मितीचे काम संघाने हाती घेतले आहे. केवळ राजसत्तेच्या माध्यमातून हे काम साधता येत नाही, ही संघाची भावना असल्यामुळेच संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांनी राजकारणापासून अलिप्त राहून संघकार्यासाठी स्वतःस समर्पित केले होते. जागरूक, संघटित लोकशक्तीचा राजसत्तेवर अंकुश राहावा आणि नैतिकतेच्या आधारावर उभ्या असलेल्या राजसत्तेकडून नैतिक भावाने देश चालविला जावा, असे संघ मानतो. देश चालविण्याकरिता ज्या काही वेगवेगळ्या व्यवस्था आवश्यक असतात, त्यापैकी राजसत्ता ही एक आवश्यक व्यवस्था असल्यामुळे, समाजजीवनात नैतिकतेच्या बळावर चालविल्या जाणाऱ्या व्यवस्था उभ्या करण्याच्या कामाप्रमाणेच, राजसत्तेत सहभागी होऊन संघाच्या स्वयंसेवकांनी ही व्यवस्था राबवावी असे संघाने ठरविले, पण भारतीय जनता पक्ष नावाचा राजकीय पक्ष म्हणजे संघ नव्हे आणि तो पक्षदेखील संघाचा नव्हे. या पक्षामध्ये संघाचे अनेक स्वयंसेवक आहेत आणि संघसंस्कार ही त्यांच्या राजकारणाची दिशा आहे. संघ आणि भाजप यांच्या नात्याचे हे निःसंदग्ध नेमकेपण सरसंघचालकांनी स्पष्ट केल्याने, संघाविषयी संभ्रम पसरविणाऱ्या राजकारणाची धार बोथट होणार यात शंका नाही. संघ आणि भाजप यांच्यातील नात्याबाबतची ही संघाची भूमिका नवी नाही. स्वयंसेवकांनी नैतिकतेच्या बळावर राजसत्तेत सहभागी होऊन देश चालवावा ही संघाची भूमिकादेखील नवी नाही. तरीही, आजदेखील संघ म्हणजे काय नाही, हे माहीत नसलेल्यांकडूनही संघाविषयी संभ्रम माजविला जात असताना, ही भूमिका नव्याने अधोरेखित होणे गरजेचे होते. सरसंघचालकांच्या या उद्बोधनातून ती मांडली गेली आहे. सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, स्वबोध व स्वदेशी आणि नियम-कायद्याचे पालन ही समाजपरिवर्तनाची सहजसाध्य साधने आहेत, हा विचार समाजसेवेच्या पुस्तकी शिक्षणातून शिकविला जाणार नाही. सज्जनशक्तीला बळ देण्यासाठी आवश्यक असलेले हे संस्कार म्हणजेच 'पंचपरिवर्तन' आहे आणि केवळ भाषणे देऊन असे परिवर्तन होणार नाही. त्यासाठी घराघरांत जावे लागेल, आपल्या घरापासून सुरुवात करावी लागेल आणि त्यासाठी अधिकचा वेळ न देता, आपल्या जीवनशैलीचा भाग म्हणून त्याकडे पाहावे लागेल. भाषा, भूषा, भजन, भोजन, भ्रमण आणि भवन हे आपले स्वतःचे असले पाहिजे, हा आपल्या जीवनशैलीचा, आपल्या घरापासून सुरू झालेला संस्कार अमलात आणला की स्वबोध होऊन परिवर्तनाची सुरुवात होते. संघ काय करतो, याचे नेमके उत्तर देणाऱ्या या उद्बोधनातून समाजपरिवर्तनाचा सोपा मार्ग सहजपणे उलगडला आहे. जे काही करावे ते प्रामाणिकपणे, उत्कृष्टपणे आणि निःस्वार्थबुद्धीने देशहितासाठी करावे आणि त्या कृतीचा प्रारंभ स्वतःपासून करावा हा संघसंस्कार घेऊन परतलेल्या श्रोत्यांना या उद्बोधनातून मिळालेली नवी दृष्टी परिवर्तनाच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरेल, यात शंका नाही.

---


## आंतरराष्ट्रीय

# बलुचिस्तानमधील धुमसती आग

**प्रा. जयसिंग यादव**

बलुचिस्तानात नुकत्याच झालेल्या हल्ल्यानंतर ४० तास चाललेल्या प्रत्युत्तर कारवाईत पाकिस्तानी सुरक्षा दलांनी दोनशे जणांना ठार मारले आहे. यामध्ये ३१ नागरिक, १७ सुरक्षा कर्मचारी आणि 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए)'च्या १४५ लढवय्यांचा समावेश आहे. बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनी राजधानी क्वेटा येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, दहशतवादाविरुद्धच्या युद्धात हा पाकिस्तानचा आतापर्यंतचा सर्वाधिक बळींचा आकडा आहे. बलुची लोक 'बीएलए' लढाऊंना रसद पुरवत आहेत. व्हायरल व्हिडीओने पाकिस्तान सरकारचे दावे उघड केले. यापूर्वी क्वेटा, ग्वादर, मुस्टुंग आणि नोशकी अशा अनेक जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी बलूच हल्ले झाले होते. 'बलूच लिबरेशन आर्मी' (बीएलए) ने हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे सैन्य, पोलिस आणि दहशतवादविरोधी युनिट्सनी मोठ्या प्रमाणात ऑपरेशन सुरू केले. या हल्ल्यानंतर लगेच पाकिस्तानी सैन्याने कोणताही पुरावा न देता हे हल्ले भारत पुरस्कृत आहेत, असा आरोप केला होता. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी या दाव्याचा पुनरुच्चार केला आणि म्हटले की, हल्लेखोरांचे भारताशी संबंध आहेत. भारताने पाकिस्तानचे निराधार आरोप फेटाळून लावले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, हे दावे केवळ पाकिस्तानच्या अंतर्गत अपयशांवरून लक्ष विचलित करण्यासाठी करण्यात आले असून पाकिस्तानची ही जुनी युक्ती आहे. प्रत्येक हिंसक घटनेनंतर निराधार आरोप करण्याऐवजी, पाकिस्तानने या प्रदेशातील आपल्या लोकांच्या दीर्घकालीन मागण्यांकडे लक्ष केंद्रित करावे. पाकिस्तानची दडपशाही, क्रूरता आणि मानवी हक्कांचे उल्लंघन करण्याची परंपरा सर्वज्ञात आहे. 'बीएलए'ने म्हटले आहे की, त्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांना लक्ष्य करून 'ऑपरेशन हेरोफ'चा दुसरा टप्पा सुरू केला आहे. लष्कराने दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये ४१ बंडखोरांना ठार मारल्याचा दावा केल्यानंतर एका दिवसात ही घोषणा करण्यात आली. त्यांच्या सैनिकांनी नोश्की येथील 'काऊंटर टेररिझम डिपार्टमेंट' (सीटीडी) मुख्यालय ताब्यात घेतले आणि 'फ्रंटियर कॉर्प्स युनिट' उद्ध्वस्त केले. त्यात अनेक पाकिस्तानी सैनिकांचा मृत्यू झाला.

१९४७ मध्ये मोहम्मद अली जिना यांनी मीर अहमद खान यांच्यासह बलुचिस्तानला स्वतंत्र देश म्हणून स्थापित करण्यासाठी प्रयत्नांचे नेतृत्व केले. १२ ऑगस्ट १९४७ रोजी बलुचिस्तानला स्वतंत्र म्हणून घोषित केले; परंतु सुरक्षा पाकिस्तानकडे सोपवण्यात आली. मार्च १९४८ मध्ये पाकिस्तानने बलुचिस्तानला आपल्यात विलीन केले. त्यामुळे तेथील लोक संतप्त झाले. जिनांनी आपले जीवन भारताचे दोन भागांत विभाजन करण्यासाठी समर्पित केले. एकेकाळी महात्मा गांधी यांचे अनुयायी असलेले जिना १९०६ ते १९२० पर्यंत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. १९२० मध्ये काँग्रेसच्या नागपूर



अधिवेशनानंतर ते काँग्रेसपासून वेगळे झाले आणि मुस्लिम लीगशी त्यांनी पूर्णपणे जुळवून घेतले. येथेच जिना भारताचे दोन भागांत विभाजन करण्याच्या वेडेपणात अडकले. बलुचिस्तानदेखील याचा बळी पडला. दुसऱ्या महायुद्धानंतर, ब्रिटिश आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले. ते आता भारतावर राज्य करू शकत नाहीत, हे त्यांच्या लक्षात आले. संपूर्ण भारतात स्वातंत्र्यासाठी बंड सुरू झाले. त्यानंतर ब्रिटिशांनी भारत सोडण्याचा निर्णय घेतला. जिना मुस्लिमांसाठी वेगळ्या देशाच्या मागणीवर ठाम होते. त्याच वेळी, कलातमध्ये, नंतर बलुचिस्तानमध्येही वेगळ्या देशाच्या स्वातंत्र्याची मागणी तीव्र झाली. १९४६ मध्ये ब्रिटिशांनी भारत सोडत असल्याचा निर्णय घेतला तेव्हा कलातचे खान मीर अहमद खान यांनी जिना यांना ब्रिटिशांसमोर आपला खटला सादर करण्यासाठी सरकारी वकील म्हणून नियुक्त केले. त्यांना विश्वास होता की, मुस्लिम मातृभूमीची मागणी करणारे जिना ब्रिटिशांसमोर त्यांची मागणी चांगल्या प्रकारे मांडू शकतील. ४ ऑगस्ट १९४७ रोजी दिल्लीमध्ये बलुचिस्तान नावाचा एक नवीन देश स्थापन करण्यासाठी एक बैठक बोलावण्यात आली. मीर अहमद खानसह जिना आणि जवाहरलाल नेहरूदेखील या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत जिना यांनी कलातच्या स्वातंत्र्याची बाजू मांडली. ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनीही कलातला भारत किंवा पाकिस्तानचा भाग बनण्याची आवश्यकता नाही, हे मान्य केले. स्वतंत्र बलुचिस्तान तयार करण्यासाठी कलात, खारान, लास बेला आणि मकरन हे चार जिल्हे विलीन करण्याचा सल्ला जिना यांनी दिला होता. ११ ऑगस्ट १९४७ रोजी कलात आणि मुस्लिम लीग यांच्यात बलुचिस्तानला स्वतंत्र देश म्हणून स्थापित करण्याचा करार झाला. तथापि, एक अडचण अशी होती की, बलुचिस्तानची सुरक्षा पाकिस्तानकडे सोपवण्यात आली. शेवटी, १२ ऑगस्ट रोजी कलातच्या खानने बलुचिस्तानला स्वतंत्र देश घोषित केले.

'बलूच नॅशनॅलिझम' या आपल्या पुस्तकात खान मोहम्मद जिना आणि खान यांच्यातील भेटीचे वर्णन करतात. बैठकीत जिना यांनी खान यांना बलुचिस्तान पाकिस्तानात विलीन करण्याचा आग्रह केला. कलातच्या शासकाने नकार दिला. त्यांनी सांगितले की, बलुचिस्तान हा अनेक जमातींमध्ये विभागलेला देश आहे आणि तो एकटाच निर्णय घेऊ शकत नाही. बलुचिस्तान स्वतंत्र देश राहावा की पाकिस्तानात सामील व्हावा हे तेथील लोकांचे निर्णय असेल. वचन दिल्याप्रमाणे, खान बलुचिस्तानला गेले आणि त्यांनी विधानसभेची बैठक बोलावली. त्यात पाकिस्तानात विलीन होण्यास विरोध होता. पाकिस्तानकडून दबाव वाढू लागला. परिस्थिती समजून घेत खान यांनी 'कमांडर-इन-चीफ' ब्रिगेडियर जनरल परवेझ यांना सैन्याची जमवाजमव करण्याचे आणि शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा व्यवस्था करण्याचे आदेश दिले. जनरल परवेझ डिसेंबर १९४७ मध्ये शस्त्रे मिळविण्यासाठी लंडनला आले. ब्रिटिश सरकारने सांगितले की, पाकिस्तानच्या परवानगीशिवाय त्यांना कोणतीही लष्करी मदत मिळणार नाही. १८ मार्च १९४८ रोजी जिना यांनी खारान, लास बेला आणि मकरन वेगळे करण्याची घोषणा केली. दुष्का एच. सय्यद यांनी त्यांच्या 'द ॲक्सेक्शन ऑफ कलात : मिथ ॲण्ड रिॲलिटी' या पुस्तकात लिहिले आहे की, जिना यांच्या निर्णयाने कलातला सर्व बाजूंनी वेढले होते. जिना यांनी अनेक बलूच सरदारांना त्यांच्या बाजूने एकत्र केले. त्यामुळे खान यांना कोणताही मार्ग उरला नाही. त्यानंतर खान यांनी भारतीय अधिकाऱ्यांना आणि अफगाण शासकांना मदतीसाठी आवाहन केले; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. २७ मार्च १९४८ रोजी 'ऑल इंडिया रेडिओ'ने परराष्ट्र विभागाचे सचिव व्ही. पी. मेनन यांनी उद्धृत केले, की कलातच्या खानने विलयासाठी भारताशी संपर्क साधला होता; परंतु भारत सरकारने ही विनंती नाकारली. तथापि, तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल आणि तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी नंतर हे विधान नाकारले. २६ मार्च रोजी पाकिस्तानी सैन्याने बलुचिस्तानात प्रवेश केला. खान यांच्याकडे जिना यांच्या अटी मान्य करण्याशिवाय पर्याय नव्हता; परंतु या ताब्यामुळे बलुचिस्तानच्या लोकसंख्येच्या मोठ्या वर्गात पाकिस्तानबद्दल द्वेष निर्माण झाला. बलुचिस्तान केवळ २२७ दिवस स्वतंत्र राहिला. खान यांचे भाऊ प्रिन्स करीम खान यांनी नंतर बलूच राष्ट्रवादींचा एक गट संघटित केला. त्यांनी १९४८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध पहिले बंड सुरू केले. पाकिस्तानने १९४८ चे बंड चिरडले. करीम खानसह अनेक लोकांना अटक करण्यात आली. बंड दडपले गेले असेल; पण ते कधीच संपले नाही. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी सुरू झालेल्या या बंडाला नवीन नेते मिळत राहिले. त्यांनी १९५०, १९६० आणि १९७० च्या दशकात पाकिस्तानी सरकारला आव्हान देणे सुरू ठेवले. २००० पर्यंत, पाकिस्तानविरुद्ध बलुचिस्तानची चार बंड झालीत. २००५ मध्ये, बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) ची स्थापना झाली आणि आजपर्यंत बलुचिस्तानचे लोक त्यांच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहेत.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

# सुंदर स्वच्छ गाव, शहर आणि शाळा

**नितीन शिरसाट**

गेल्या दशकात अनेक मूलभूत बदल घडताना दिसत आहेत. पायाभूत सुविधा, शिक्षण, तंत्रज्ञान, प्रशासन आणि सामाजिक जाणीव या सगळ्या पातळ्यांवर नव्या धोरणांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. २०१६ मध्ये सुरू झालेल्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी स्मार्ट सिटीज मिशनअंतर्गत १० वर्षांत देशातील ३१ शहरे पूर्णपणे 'स्मार्ट' झाली असून महाराष्ट्रातील पुणे आणि सोलापूर या दोन शहरांचा या यशस्वी यादीत समावेश आहे. स्मार्ट सिटी संकल्पनेपासून ते 'मिशन निर्लेखन'सारख्या शिक्षणप्रधान मोहिमांपर्यंत तसेच ग्रामपंचायतींच्या आदर्श ठरावांपासून ते मोबाईल-टीव्हीपासून मुक्त सायंकाळ घडविण्याच्या निर्णयांपर्यंत हा सगळा प्रवास केवळ योजनांचा नसून मानसिकतेतील बदलाचाही आहे. बुलढाणा जिल्हा या बदलांचा साक्षीदार ठरत आहे. पुणे व सोलापूरसारख्या महाराष्ट्रातील शहरांचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश होणे ही बाब राज्यासाठी महत्त्वाची मानावी लागेल. सुरुवातीला केवळ महानगरांपुरती मर्यादित असलेली स्मार्ट सिटी संकल्पना आता मध्यम आणि लहान शहरांपर्यंत विस्तारताना दिसते.

स्मार्ट सिटी म्हणजे केवळ डिजिटल फलक, सीसीटीव्ही कॅमेरे किंवा ॲप्स नव्हेत तर नागरिकांना मूलभूत सुविधा, सुरक्षितता, पारदर्शक प्रशासन आणि पर्यावरणपूरक विकास यांचा समन्वय साधणारी जीवनपद्धती आहे. या पृष्ठभूमीवर स्मार्ट राज्य ही संकल्पना केवळ शहरांपुरती मर्यादित न राहता ग्रामीण व निमशहरी भागांपर्यंत पोहोचली तर त्याचा थेट लाभ बुलढाण्यासारख्या जिल्ह्यांनाही होऊ शकतो. जिल्ह्यात मोठे आयटी पार्क किंवा मेट्रो नसतील पण इथे जर शिक्षण व्यवस्था सक्षम झाली, ग्रामपंचायतींचा कारभार पारदर्शक झाला आणि समाजात संवाद वाढला तर हा जिल्हा स्वतःच्या पातळीवर स्मार्ट ठरू शकतो. स्मार्टनेस म्हणजे काचांच्या इमारती नव्हेत तर माणसाच्या विचारातील बदल आहे, ही जाणीव बुलढाण्यात हळूहळू रुजताना दिसते. बुलढाणा जिल्ह्यातील तब्बल १ हजार ४०० शाळांमध्ये मिशन निर्लेखन मोहीम राबवली जात आहे ही बाब आशादायक आहे. प्राथमिक शिक्षणात वाचन-लेखन-गणित या मूलभूत कौशल्यांवर भर देण्याचा हा प्रयत्न आहे. देशभरात साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी गुणवत्तेचा प्रश्न आजही ऐरणीवर आहे. अनेकदा विद्यार्थी शाळेत जातात परंतु वाचन किंवा साधे गणित नीट जमत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मिशन निर्लेखनमुळे शिक्षक प्रशिक्षण विद्यार्थ्यांचे स्तरनिहाय मूल्यमापन आणि पालकांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न होत आहे. ग्रामीण भागात ही मोहीम केवळ शैक्षणिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ ठरू शकते. ग्रामीण विकास विभागाच्या निर्देशांनुसार जिल्ह्यातील १,४०० शाळांमधून जीर्ण आणि असुरक्षित संरचना काढून टाकण्यासाठी एक व्यापक मिशन निर्लेखन मोहीम सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन जुन्या वर्गखोल्या, इमारती, शौचालये आणि पाण्याच्या टाक्या ३१ मार्च २०२६ पर्यंत काढून टाकण्याचे उद्दिष्ट आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था शालेय व्यवस्थापन समित्या आणि पालकांची भूमिका महत्त्वाची ठरते. सामाजिक शिस्तीचा प्रयोग करण्यासाठी सायंकाळी ठरावीक वेळेला मोबाईल व टीव्ही बंद ठेवण्याचा तसेच त्यासाठी दररोज सायरन वाजवण्याचा ठराव हा निर्णय अनेकांच्या भुवया उंचावणारा असला तरी विचार करायला भाग पाडणारा आहे. दररोज सायंकाळी ७ ते ८.३० या दीड तसाच्या कालावधीत कुटुंब वेळ पाळण्याचा ठराव राहुरी (जिल्हा अहमदनगर) नगरपरिषदेने एकमतांने मंजूर केला आहे. आजच्या डिजिटल युगात स्क्रीनवर घालवला जाणारा वेळ प्रचंड वाढला आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळेच याच्या आहारी जात आहेत. या पृष्ठभूमीवर काही काळ का होईना कुटुंबाने एकत्र बसावे, संवाद साधावा, मुलांनी अभ्यास करावा किंवा मैदानी खेळ खेळावेत हा उद्देश नाकारता येणार नाही. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात असलेल्या टाकरखेड ग्रामपंचायतीने विधवांच्या उन्नतीसाठी पाऊल टाकले. विधवा प्रथामुक्त गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन मानस फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी. एस. लहाने यांनी केले. ग्रामपंचायत सरपंच लता डहाके व ग्रामसेविका एस. पी. माने यांनी पुढाकार घेत महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या तालुक्यातील वळती ग्रामपंचायतीने घेतलेला 'आदर्श संवाद ठराव' हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासातील उल्लेखनीय म्हणावा लागेल. ग्रामसभांमध्ये केवळ ठराव मंजूर करण्यापुरते मर्यादित न राहता ग्रामस्थांमध्ये संवाद चर्चा आणि मतभेद मोकळेपणाने मांडण्याची परंपरा रुजवण्याचा हा प्रयत्न आहे. लोकशाही केवळ मतदानापुरती नसून सततच्या संवादातून ती समृद्ध होते.

९८८१७१७८२८

---

## इतस्ततः

# अर्थसंकल्पातून रोजगार संधी...!

**दत्तात्रेय आंबुलकर**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी अर्थसंकल्पात नमूद केलेल्या महत्त्वपूर्ण तरतुदींमध्ये उद्योग-व्यवसायाच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्ससह सेमीकंडक्टर क्षेत्राला चालना देणे, निवड उद्योग क्षेत्राला उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहनपर राशी देणे, एमएसएमई क्षेत्राच्या वाढीसाठी दहा हजार कोटी रुपयांची केलेली विशेष तरतूद इ.चा प्रामुख्याने समावेश करता येईल. याशिवाय, क्षेत्रनिहाय आरोग्य क्षेत्र व उपचार - औषध निर्माणाद्वारे आरोग्यसेवा क्षेत्राला मोठे पाठबळ देण्यात आले असून, अर्थसंकल्पीय तरतुदींनुसार, नव्या व्यवसाय संधींसह रोजगारवाढीला निश्चितपणे चालना मिळणार आहे. याशिवाय, विविध व्यवसायांशी निगडित अशा मूलभूत सुविधा व बांधकाम, रस्तेबांधणी, वाहतूकसेवा, उत्पादन-विक्री याद्वारे नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

यासंदर्भात 'क्वेस कॉर्प'चे मुख्य कार्यकारी अधिकारी लोहित भाटिया यांच्या मते, नव्या अर्थसंकल्पामध्ये एकूणच मूलभूत बांधकाम व सुविधा क्षेत्रात व्यापक व्यवसायवाढ करून, त्यासाठी आवश्यक अशा कौशल्य विकासाद्वारे विविध क्षेत्रांमध्ये रोजगारांची वाढ निश्चितपणे होणार आहे. त्यांच्या मते, नव्या व महत्त्वपूर्ण तरतुदींमध्ये संगणक-सेवा क्षेत्रांतर्गत डेटा सेंटर्स, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवे व्यवसाय, आरोग्यसेवांसह वृद्धांवरील उपचार, हायस्पीड कॉरिडॉर्स यासारखे मोठे व महत्त्वाकांक्षी प्रकल्प, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासह विदेशातील पर्यटन यासारख्या उद्योगांना मोठा वाव मिळणार आहे. यातूनच आपली व्यावसायिक अर्थव्यवस्था नजीकच्या भविष्यात कौशल्यांवर आधारित रोजगार देण्यासाठी अधिक सक्षम होण्याचा दावा लोहित भाटिया यांनी केला आहे. जागतिक स्तरांवर पाकिस्तानसह विविध देशांशी झालेल्या अथवा अद्याप सुरू असणाऱ्या युद्धांच्या पृष्ठभूमीवर आपल्या अर्थव्यवस्थेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात सावधपूर्ण भूमिका घेत यशस्वीपणे मात केली, असे मत 'रॅनस्टॅड इंडिया'चे मुख्य आर्थिक सल्लागार नागेश बेस्कूर यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, नव्या अर्थसंकल्पातील नव्या आर्थिक तरतुदींचा फायदा बायोफार्मा, सेमीकंडक्टर्स, वस्त्रोद्योग व त्याची निर्यात, प्रगत जाहिरात क्षेत्र, याशिवाय नव्या क्षेत्रातील संशोधन क्षेत्राला होणार आहे.



नागेश बेस्कूर यांच्या मते, सरकारने नव्याने घोषित केलेल्या 'बायोफार्मा शक्ती' यांसारख्या प्रगत उद्योगांना पूरक अशा धोरणांमुळे मोठा लाभ मिळणार आहे. हीच बाब 'सेमीकंडक्टर - मिशन २' यासारख्या उद्योगांना प्रामुख्याने लागू असून, केंद्रीय स्तरावर नजीकच्या काळात आरोग्यसेवा क्षेत्राचा विस्तार, टेक्सटाईल पार्क, प्रगत तंत्रज्ञान विकास केंद्र इत्यादींना लागू असून, त्यांच्यानुसार ही सारी नवी व नव्याने विकास होणारी व्यवसाय क्षेत्रे नव्या कौशल्य विकासाच्या माध्यमातून वाढत्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणारी ठरणार आहेत. अर्थसंकल्पात स्पष्टपणे नमूद केल्यानुसार, उत्पादन क्षेत्राला नव्याने दिलेले पाठबळ, प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञानावर देण्यात आलेला भर, कौशल्य विकासवाढीच्या माध्यमातून उद्योगपूरक वातावरणाची निर्मिती इ.मुळे रोजगाराच्या नव्या संधींची भर पडणार आहे. या नव्या धोरणात्मक निर्णयांच्या परिणामी, उद्योगांसाठी गुंतवणुकीची भर व त्यातून रोजगारनिर्मिती या उभयतांना चालना मिळेल. या संदर्भात अधिक तपशिलात गेल्यास असे स्पष्ट होते की, अर्थसंकल्पीय तरतुदींचा थेट परिणाम ज्येष्ठांसाठी आरोग्यसेवा क्षेत्र, विविध प्रकारचे अद्ययावत मनोरंजन व्यवसाय व त्याशिवाय उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने वाढत्या प्रमाणावर आवश्यक ठरलेले डिझाईन क्षेत्रामध्ये मोठ्या संख्येने व विविध स्तरांवर रोजगार उपलब्ध होऊ शकतात. हे निवडक व्यवसाय इतर उद्योग-व्यवसायांच्या तुलनेत माफक आर्थिक गुंतवणुकीतून सुरू करता येतात. त्यामुळे नवागतांसह स्टार्टअप उद्योगांना आता मिळणाऱ्या प्रोत्साहनातून विविध स्तरांवर रोजगार निश्चितपणे उपलब्ध होऊ शकतात.

'केपीएमजी'चे ज्येष्ठ विषयतज्ज्ञ नारायणन रामस्वामी यांनी स्पष्ट केल्यानुसार, नव्या व प्रगत तंत्रज्ञान आणि संगणकीय पद्धतींवर आधारित व्यवसायवाढीला आता चालना मिळणार आहे. त्यांच्या मते, या वयोगटात अव्वल क्षमतेसह नावीन्य व सुधारणांवर आधारित बौद्धिक क्षमता मोठी असते. त्याच वेळी त्यांच्या नव्या, छोटेखानी; पण महत्त्वाच्या अशा स्टार्टअप स्वरूपातील लघु; पण महत्त्वाच्या व्यवसायांची सुरुवात करण्यासाठी कमी आर्थिक गुंतवणुकीसह सुरुवात करता येते. त्यामुळे लवकरच अशा नावीन्यपूर्ण स्टार्टअप उद्योगांची संख्या वाढून रोजगारनिर्मिती नक्कीच होणार आहे.

नारायणन रामस्वामी यांच्यानुसार, या नव्या व बदलत्या औद्योगिक-व्यावसायिक बदलांमुळे भारत आणि भारतीयांच्या कौशल्यांद्वारे मिळणाऱ्या नव्या व मोठ्या रोजगार संधींचा लाभ भारतासह इतर विकसित आणि विकसनशील देशांना पण निश्चितपणे होणार आहे. याच्याच परिणामी, आता भारतीयांच्या कौशल्य-कामगिरीला जागतिक पातळीवर मान्यता मिळू लागली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. या मुद्द्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योग-व्यवस्थापनासाठी उच्च व्यवस्थापकीय पदांवर भारतीय व्यवस्थापक-विषयतज्ज्ञांची निवड करणाऱ्या प्रमुख कंपन्यांनी पण या मुद्द्याला दुजोरा दिला आहे. 'टीमलीज'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीती शर्मा यांच्यानुसार, प्रगत भारतातील विकसित कौशल्य-कामगिरीमुळेच भारताच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळाली, याची नेमकी दखल जागतिक पातळीवरील उद्योग-व्यवसायासह वित्तीय संस्थांनी घेतली असून, त्याचे पडसाद यापूर्वीच दिसायला लागले असून, त्याचे दूरगामी व सकारात्मक परिणाम निश्चितपणे दिसणार आहेत. दरम्यान, यावेळच्या अर्थसंकल्पात 'एमएसएमई' क्षेत्रासाठी दहा हजार कोटी रुपयांच्या विशेष तरतुदींसह मोठे आर्थिक पाठबळ दिले आहे. लघुउद्योगांमध्ये रोजगारनिर्मिती क्षमता असते, हे एक अनुभवसिद्ध सत्य आहे. त्यातही नव्या व बदलत्या व्यावसायिक स्थितीनुसार भारतीय लघुउद्योग क्षेत्राने, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राने जी मोठी मजल गाठली, त्याचा उपयोग आता नव्या अर्थसंकल्पामुळे रोजगारवाढीसाठी होऊ घातला आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

---

## वाचक पत्रे

### प्रेम की भ्रम? व्हॅलेंटाईन संस्कृतीमागील वास्तव

आज खरे प्रेम हे एका विशिष्ट दिवसापुरते मर्यादित न राहता संपूर्ण आयुष्यभर जपले जाणारे मूल्य असायला हवे. प्रेम म्हणजे केवळ आकर्षण, जवळीक किंवा शारीरिक ओढ नसून त्यामागे जबाबदारी, आदर आणि निष्ठा असणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीत प्रेमाला संयम, त्याग आणि कर्तव्याची जोड दिली गेली आहे. मात्र आजच्या घडीला या सगळ्या मूल्यांकडे दुर्लक्ष करून क्षणिक भावना आणि भावनात्मक आवेगालाच प्रेम समजले जात आहे, ही चिंतेची बाब आहे. युवक-युवतींनी समाजमाध्यमांवर दिसणाऱ्या चमकदार चित्रांमागील वास्तव ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येक नातं सोशल मीडियावर दाखवण्यासारखं किंवा प्रदर्शनासाठी नसतं. खरे नाते हे गुप्त, सुरक्षित आणि दोघांच्या सन्मानावर आधारलेले असते. त्यामुळे भावनांच्या भरात कोणताही निर्णय न घेता, विचारपूर्वक आणि सजगपणे वागणे हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे. हल्लीच्या तरुण वर्गासाठी फेब्रुवारी महिना विशेष महत्त्वाचा मानला जातो. हा महिना 'प्रेमाचा महिना' म्हणून ओळखला जातो. विशेष म्हणजे पाश्चात्त्य देशांनाही आश्चर्य वाटेल असा 'प्रेमाचा सप्ताह' भारतात ७ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारीदरम्यान मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. रोझ डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे आणि शेवटी व्हॅलेंटाईन डे असा हा संपूर्ण आठवडा साजरा केला जातो. प्रत्यक्षात, एवढ्या प्रमाणात हे दिवस विदेशातही साजरे केले जात नाहीत. यावरून भारतीय तरुणाईवर पाश्चात्त्य संस्कृतीचा किती खोलवर प्रभाव पडलेला आहे, हे स्पष्ट होते. मात्र प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे साजरे केलेले प्रेम खरोखर टिकते का? प्रेम म्हणजे जिथे आपुलकी, विश्वास आणि समजूतदारपणा असायला हवा, तिथे आज बाजारूपणाची अंध स्पर्धा सुरू आहे. प्रेम व्यक्त करण्यासाठी चॉकलेट, महागड्या भेटवस्तू आणि आकर्षक शुभेच्छापत्रांनाच अधिक महत्त्व दिले जात आहे. आजच्या तरुण पिढीला आपले ऐतिहासिक दिवस आठवण करून द्यावे लागतात, पण हे विदेशी 'डे' मात्र मोठ्या उत्साहाने आणि न चुकता साजरे केले जातात, ही खेदाची बाब आहे. १४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डेच्या पृष्ठभूमीवर प्रेमाच्या नावाखाली अनेक आक्षेपार्ह आणि बीभत्स प्रकार घडताना दिसत आहेत. 'लव्ह जिहाद'सारख्या गंभीर आणि संवेदनशील घटना समाजात घडत असताना देखील या दिवसाचे अंधानुकरण थांबताना दिसत नाही. त्यामुळे व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा दिवस नसून अनेक अर्थांनी 'काळा दिवस' ठरत असल्याचे म्हणणे गैर ठरणार नाही. या दिवसांच्या निमित्ताने विदेशी कंपन्या मोठ्या प्रमाणावर आपला व्यवसाय वाढवत आहेत आणि भारतीय जनता मात्र भावनिक पातळीवर फसवली जात आहे. या फसवणुकीला बळी केवळ तरुणीच नाहीत, तर तरुणांनाही यामध्ये सावध राहण्याची गरज आहे. कारण या डेच्या आडून आमिष दाखवून लव्ह जिहाद, धर्मांतरण तसेच विविध प्रकारच्या फसवणुकीचे प्रकार वाढताना दिसत आहेत. म्हणूनच आता वेळ आली आहे की तरुणांनी स्वतः जागरूक राहून आपल्या मित्रमंडळींनाही जागरूक करावे. समाजात पसरत चाललेल्या या अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी सजगता आवश्यक आहे.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

●● ●●

### महाशिवरात्रीला शिवभक्ती करूया

माघ वद्य चतुर्दशी हा भगवान शिव देवतेचा ध्यानातून समाधीकडे जाण्याचा काळ असतो. या काळात शिव तत्त्व वातावरणातील हलाहल म्हणजे रज-तम स्वीकारत नाही. साहजिकच रज-तमाचे वातावरणातील प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढते आणि त्याचा त्रास मानवाला होऊ नये, यासाठी हिंदू धर्मात महाशिवरात्री हे व्रत सांगितले आहे. व्रतस्थ राहणे, पवित्र जलाने स्नान करणे, संकल्प सोडून उपवास व जागरण करणे आणि शिवपूजन करणे ही या व्रताची प्रमुख अंगे आहेत. या दिवशी शिवोपासना अधिकाधिक करावी ज्यामुळे आपल्याकडून शिवतत्त्व अधिक प्रमाणात ग्रहण होईल व रज-तमयुक्त वातावरणापासून आपले रक्षण होईल. शिवतत्त्व आकर्षित करणारी रांगोळी काढणे, ॐ नमः शिवाय हा नामजप सतत करणे, शिव मंदिरात जाऊन नंदी दर्शन, शृंगदर्शन, शिवपूजन करणे, शिवाला थंड जल, दूध किंवा पंचामृताने स्नान व अभिषेक करणे, पांढऱ्या अक्षता, पांढरी फुले, बिल्वदल, भस्म यासह शिवाचे पूजन करणे, केवडा किंवा चमेलीचे अत्तर अर्पण करून उदबत्तीने ओवाळणे, शिवपिंडीला सोमसूत्री प्रदक्षिणा घालणे या कृतींमुळे शिवतत्त्व अधिक आकर्षित होते. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि व्रत हा विज्ञानावर आधारित आणि ईश्वरप्राप्तीच्या दिशेने पुढे नेणारा आहे. पण तो साजरा करताना आपण अंतर्मुख असणे अपेक्षित आहे. उंची, रंगीबेरंगी वस्त्रे, चित्रविचित्र केशभूषा, प्रेक्षणीय दिसण्यासाठीच्या हालचाली व चेहऱ्यावरील रंगरंगोटी यामुळे स्वतःसह इतरांचीही वृत्ती बहिर्मुख होते. यापेक्षा शबरी, भक्त प्रल्हाद, ध्रुव बाळ यांचे चेहरे आठवून आपण त्यांच्यासारखी भक्ती एक दिवस तरी करूया.

**छाया मिराशी**/पुणे

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धारूर घाट की मृत्यूचा सापळा? वारंवार होणाऱ्या रक्ताच्या सड्याला जबाबदार कोण?

## प्रशासनाच्या ढिम्म कारभाराविरोधात नागरिकांचा संयम सुटला; आता आंदोलनाशिवाय पर्याय नाही!

धारूर | प्रतिनिधी

धारूर घाटात मंगळवारी दुपारी झालेला भीषण अपघात ही केवळ एक घटना नसून, प्रशासकीय दिरंगाईने केलेला 'नरसंहार' आहे. लातूरकडून भंगार घेऊन जाणाऱ्या ट्रकने (MH १८ BG ३२८८) दोन निष्पाप दुचाकीस्वारांना चिरडले. जनार्दन चौरे आणि रावसाहेब चौरे हे बाप-लेक सध्या मृत्यूशी झुंज देत आहेत. पण प्रश्न हा आहे की, या रक्ताच्या सड्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि लोकप्रतिनिधी घेणार का?

प्रशासकीय 'बधिरपणा' आणि प्रलंबित रुंदीकरण

गेल्या अनेक वर्षांपासून धारूर घाटाच्या रुंदीकरणाची मागणी निवेदनांच्या कचरापेटीत पडली आहे. दर आठवड्याला येथे एक अपघात होतो, कोणाचे तरी कुंकू पुसले जाते, तर कोणी कायमचे अपंग होते. बातम्या छापून आल्यावर प्रशासन दोन दिवस जागे झाल्याचे सोंग घेते आणि पुन्हा 'कुंभकर्णी' झोपेत जाते. घाटातील अरुंद वळणे आणि सध्या सुरू असलेली ऊस वाहतूक यामुळे हा घाट आता 'मृत्यूचा सापळा' बनला आहे.

नेते फक्त मतांसाठी, नागरिकांच्या जिवाचे काय?

निवडणुकीच्या वेळी मोठमोठी आश्वासने देणाऱ्या नेत्यांना धारूर घाटातील खड्डे आणि अरुंद रस्ते दिसत नाहीत का? की आणखी काही बळी जाण्याची प्रशासन वाट पाहत आहे? या घाटात ज्यांचे अपघात झाले, त्या कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. तरीही सरकारला पाझर फुटत नसेल, तर हे लोकशाहीचे अपयश आहे.



### आता वेळ आलीय रस्त्यावर उतरण्याची!

आतापर्यंत शांत राहिलेले धारूरकर आणि प्रवासी आता आक्रमक झाले आहेत. "निवेदने देऊन झाली, बातम्या वाचून प्रशासन ढिम्म आहे, आता रस्ता रोको आणि तीव्र आंदोलनाशिवाय हे प्रशासन ऐकणार नाही," असा सूर नागरिकांमधून उमटत आहे. जोपर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नाही, तोपर्यंत लोकप्रतिनिधींना जाब विचारण्याचा निर्धार तरुणांनी केला आहे.

"प्रशासनाचे हात रक्ताने माखले आहेत"

प्रत्येक अपघातानंतर पंचनामा होतो, पण रस्त्याच्या दुरुस्तीचा 'नामा' कधी होणार? जर तात्काळ रुंदीकरण आणि सुरक्षा उपाययोजना केल्या नाहीत, तर धारूर घाट परिसरातील जनता तीव्र जनआंदोलन छेडण्याच्या तयारीत आहे. याची सर्वस्वी जबाबदारी शासन आणि प्रशासनाची असेल.

# ना. पंकजाताईंचे माध्यमातुन परळी येथे होणारा महा पशुधन एक्सपो मेळावा

बीड प्रतिनिधी.

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे दि. १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत महापशुधन एक्स्पो मेळावा घेऊन बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक विकासासाठी नवसंजीवनी निर्माण करुन दिली आहे शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे

**शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे**

**महापशुधन एक्स्पो मेळावा म्हणजेच बीडच्या शेतकऱ्यासाठी दुग्ध मिश्रित असा शर्करा योग आहे असे म्हटलं तर हरकत नाही म्हणून बीडच्या शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी व नव एक चैतन्य शक्ती आहे.**

**- भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील**

बीड जिल्ह्यातील परळी येथे दि. १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी यादरम्यान पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या विभागाद्वारे महापशुधन एक्स्पो हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी सशक्त पशुधन बीड जिल्ह्यातील व राज्यातील शेतकरी पशुपालकांना नवनवीन पशुधनाची व त्यांच्या निगराणीविषयी तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या करिता हे महापशुधन एक्स्पोचे आयोजन केले आहे या प्रदर्शनात १५०० विविध प्रकारची उत्कृष्ट माहिती देण्यात येणार आहे त्यामुळे या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी व बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे.

# जातीवाचक शिवीगाळ प्रकरणातील आरोपीची अटकपुर्वक जामीन नांमजूर

बीड. प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील येथील नांदलगाव येथील आदिवासी समाजातील ग्रामरोजगार सेवक जालिंदर सुरवसे याला बोलावुन घेऊन जातीवाचक शिवीगाळ करुन गावातील आश्रुबा उत्तम राऊत, गोंविंद सखाराम राऊत, विष्णु आश्रुबा राऊत, भगवान आश्रुबा राऊत, अनिल शिंदे, अनिल ताराचंद राऊत, विमल सखाराम राऊत, अनिता विष्णु राऊत, आयोद्या भगवान राऊत, कांताबाई ताराचंद्र राऊत यांनी जातीवाचक शिवीगाळ करुन रक्तबंबाळ होईपर्यंत सुरवसे यास मारहाण करण्यात आली होती. सुरवसे यास करण्यात आलेली मारहाण ही जबर अशी मारहाण होती. त्यामध्ये त्याच्या अंगावर मारहाणीचे वळ उमटलेले होते. त्याचे शरीर काळे निळे पडल्याचे दिसुन आले, त्यांच्या शरीरावर सर्व बाजुने रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण करण्यात आली होती. त्यास लाथा - बुक्यासह लोखंडी रॉड, वायर, काठ्यांने मारहाण केली होती. तसेच महिलांनी तोंडाला काळे लावले व चपलाने तोंडावर, पाठीवर मारहाण केली. या मारहाणीमध्ये सुरवसेचे हात- पाय फॅक्चर झाले. त्यास जातीवाचक शिवीगाळ करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

वरील लोक मारहाण करते वेळी म्हणत होते की, याला कोणी त्याचे नातेवाईक सोडावयाला आले तर, त्यांचा पाय काढु पिडीताची बहिण व आई तलवडा पो.स्टे.ला तक्रार देण्याकामी गेले असता, पोलीसांनी राजकीय दबावापोटी तक्रार नोंदवुन न घेता बाहेर काढले. तलवडा पोलीस स्टेशन यांनी उशिरा तक्रार नोंदवुन आरोपी विरुद्ध बी.एन.एस. कलम 119 (1), 118 (2), 118 (1), 115 (2), 189 (2), 189 (4), 191 (2), 191 (3), 190 आणि अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम 1989 3(1)(s), 3(2) (va) अन्वये दि. 10.12.2025 रोजी तलवडा पोलीस स्टेशन येथे गुन्ह्याची नोंद केली.

आरोपी नामे, गोविंद सखाराम राऊत, आश्रुबा उत्तम राऊत, विष्णु आश्रुबा राऊत, व भगवान आश्रुबा राऊत यांनी विशेषे जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब बीड यांच्या न्यायालयात अटकपूर्व जामीनसाठी फौजदारी जामीन अर्ज क्रमांक 66/2026 दाखल केला होता. सदरील आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मा. न्यायालयाने दिनांक 03.02.2026 रोजी नामंजूर केला.

# मनोज जरांगे पाटील यांच्याकडून बालकलाकारांना कौतुकाची थाप!

बीड, प्रतिनिधी- अनिल दादा जगताप फाउंडेशन व शिवसेना बीड आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडकाच्या या रंगमंचावरून मी उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो. बीडच्या मातीतून घडणाऱ्या बालकलाकारांना हा महोत्सव नवी दिशा देणारा ठरो. चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून बीडमधून असंख्य गुणवंत कलाकार घडू देत आणि बीड जिल्ह्याचे नाव राज्यभर मोठं व्हावं, अशी सदिच्छा व प्रार्थना व्यक्त करत संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी बालकलाकारांचे मनोबल वाढवले. दि. २ फेब्रुवारीपासून बीड येथे सुरू असलेल्या या महोत्सवांतर्गत शिशुगट समूह नृत्य स्पर्धा व वैयक्तिक नृत्य स्पर्धा (इंग्रजी माध्यम) यांचा उद्घाटन सोहळा काल दि. 9 फेब्रुवारी रोजी पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व कला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कांबळे यांनी करून महोत्सवाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. आपल्या भाषणात अनिल दादा जगताप यांनी सांस्कृतिक रंगमंचावर बालकलाकारांचे कौतुक करण्यासाठी मनोज दादा जरांगे पाटील यांची उपस्थिती लाभल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



आजपासून 12 वीच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत त्यासाठी जिल्हा परिषद चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांनी शहरातील चंपावती मीलीया बलभीम आदि परीक्षा सेंटरला भेटी दिल्या व परीक्षेतील परिस्थितीची पाहणी केली

# बीड जिल्ह्यातील सर्व केवायसी व आधार सादरीकरणाचे आवाहन

बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्हयातील सर्व शेतकरी यांना आवाहन करण्यात येते की, राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत, कर्जाच्या विळख्यातुन सोडवणूक करण्यासाठी आपत्कालीन व दीर्घकालिन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शेती कर्जाची माहिती पोर्टलवर भरण्या बाबत शासनाचे युध्द पातळीवर कामकाज सुरु असुन ही माहिती शासनाने पोर्टलवर भरण्यासाठी सर्व थकबाकीदार शेतकऱ्यांचे केवायसी करणे आवश्यक असल्यामुळे त्यांचे आधार नंबर आवश्यक आहेत. तरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या व बँकेकडे बहुतांश शेतकऱ्यांचे आधार कार्ड उपलब्ध नाहीत त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना विनंती करण्यांत येते की, 'बीड जिल्हयातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत घेतलेल्या कर्जाबाबत शेतकऱ्यांचे केवायसी करणे आवश्यक असल्याने तसेच जे शेतकरी मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी विविध सेवा सहकारी संस्था व बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेत वारसांची नावे देऊन सर्वांनी त्यांचे आधार कार्ड संबंधीत गटसचिव व बँकेचे शाखाधिकारी यांचेकडे जमा करावेत असे आवाहन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बीड चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शरद चंद्रभान ठोंबरे हे करत आहेत.

## राजेंद्र मस्के यांच्या पुढाकाराने पाटोदा (बे)पंचक्रोशीतील भक्तांची मागणी पूर्ण, श्री दत्त मंदिराचे नवे रुप उजळले!

# पाटोदा बेलखंडी शिवारात साठवण तलावाला प्राधान्य देऊ — राजेंद्र मस्के

बीड प्रतिनिधी

पाटोदा बेलखंडी परिसरातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कृषी सिंचन क्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी साठवण तलाव उभारणीला प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली.

मस्के यांनी सांगितले की, या परिसरातील शेती उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी पाण्याचा शाश्वत स्त्रोत निर्माण करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे आगामी काळात कचारवाडी शिवारात साठवण तलाव मंजूर करून घेण्यासाठी प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला जाईल.

नगदी पिकांच्या शेतीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यासाठी जलसिंचन सुविधा मजबूत करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. आज लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील पाटोदा (बेलखंडी) शिवारातील दत्तनगर येथील उंच टेकडीवरील श्रीदत्त मंदिराकडे जाणाऱ्या सिमेंट कॉंक्रीट पायऱ्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून, या कामाचा लोकार्पण



कार्यक्रम प्रसंगी उपस्थित लोकांसी संवाद साधला

महंत श्रीधर दादा जामोदेकर व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी भक्तीदास महाराज, माजी सरपंच अमोल बडगे, मंजूर फेडरेशनचे संचालक बद्रीनाथ जटाळ,यांच्या सह कार्यक्रमास ग्रामस्थ, पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय किसान संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा विशाल मोर्चा निघणार- आप्पाराव यादव

**तभा वृत्तसेवा**

अंबाजोगाई : बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी भारतीय किसान संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर 23 फेब्रुवारी 2026 रोजी भारतीय किसान संघाचे महाराष्ट्र प्रांताध्यक्ष बळीरामजी सोळुंके यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा विशाल मोर्चा निघणार असल्याची माहिती जिल्हा मंत्री आप्पाराव यादव यांनी दिली.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात यादव यांनी पुढे म्हटले आहे की,

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या संदर्भात वारंवार विनंती करूनही समस्या सुटत नसल्याने बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्ग संतप्त झाला असून, त्यांनी पी एम व सीएम सन्मान निधीत दुप्पट वाढ करावी,सन 2025 मध्ये खरीप हंगामात जाहीर केलेला 17500 रुपयांचा विमा त्वरित द्यावा, खेड्यातील पांदण रस्त्यांची कामे तात्काळ सुरू करून येत्या खरीप हंगामापूर्वी पूर्ण करावीत,2025 च्या अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक रस्ते खड्डेमय झाले ते तात्काळ बुजविण्यात यावेत, गाव जोड रस्ते, ग्रामीण मार्ग, प्रमुख जिल्हा मार्गाचे तात्काळ मजबुतीकरण करावे, सोलार पंप करिता ज्या शेतकऱ्यांनी शेतकरी हिस्सा भरलेला आहे त्यांचे सोलार पंप तात्काळ बसवावेत, सध्या पारंपारिक ऊर्जेचे कोटेशन देणे बंद केली आहे ते भरून देऊन तात्काळ कनेक्शन द्यावे, पूर्ण दिवसभर बारा तास विद्युत पुरवठा पूर्ण दाबाने सातत्याने द्यावा, विद्युत वितरण विभागाच्या गलथान कारभारामुळे ज्या शेतकऱ्यांचा ऊस जळालेला आहे त्याची नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी, प्रवाही सिंचनाची वाढवलेली पाणीपट्टी कमी करण्यात यावी, पैठण उजव्या कालव्याच्या वितरिका, उपवितरिका, लघु वितरिकांचे टेल पर्यंत लाइनिंग करून द्यावी, यासाठी संपादित केलेली जमीन शेतकऱ्यांच्या नावावरून कमी करावी, सर्व शेतमालाची शासकीय हमीभावाने खरेदी बारा महिने चालू ठेवावी, गोदावरी नदीवरील राजा टाकळी, ढालेगाव, तपेनिमगाव, रामपुरी,बबूलतारा, व इतर शिवारातील संपादित क्षेत्राचा मोबदला विना विलंब द्यावा, शेतकऱ्यांकडे असलेले पीक कर्ज सरसकट मार्च 2026 पूर्वी माफ करण्यात यावे, महा डीबीटी पोर्टल वरील निवड करण्यात आलेले वाहने व इतर यांत्रिकी कारणासाठी निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना पूर्वसंमती देण्यात यावी, शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या यांत्रिकीकरणाची अनुदानित रक्कम शेतकर्यांच्या खात्यावर लवकरात लवकर जमा करावी, पी एम किसान सन्मान निधीच्या काही लाभार्थ्यांची रक्कम खात्यावर येणे बंद केले आहे ती पूर्ववत सुरू करावी, 2019 पूर्वीचे फेरफार असणारे हजारो शेतकरी पीएम व सीएम किसान निधी पासून वंचित आहेत त्यांना सन्माननिधी लवकरात लवकर सुरू करावा, भूमीहीन लोकांना स्वस्त धान्य दुकानांमार्फत धान्य देण्यात यावे, सुशिक्षित बेकार व बेरोजगार तरुणांना उद्योगासाठी कर्ज पुरवठा करण्यात यावा, वन्य प्राण्यांना वनखात्याकडून बंदोबस्त करावा अन्यथा वन्य प्राण्यांनी शेती पिकाचे जे नुकसान केले त्याचे नुकसान भरपाई सात दिवसात मिळावी, वन्य प्राण्यांपासून पिकाचे संरक्षण व्हावे म्हणून मागील त्याला 90% अनुदानावर कुंपण द्यावे, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी राहावे,

अशा मागण्या भारतीय किसान संघाने केल्या असून या मागण्या 22 फेब्रुवारी 2026 पर्यंत सोडविण्यात याव्यात अन्यथा नाईलाजाने 23 फेब्रुवारी 2026 रोजी आपल्या कार्यालयावर भारतीय किसान संघ जिल्हा शाखा बीड च्या वतीने मोर्चा काढण्यात येईल त्यामुळे होणाऱ्या परिणामांची जबाबदारी प्रशासनावर राहील असा गर्भित आप्पाराव यादव यांनी इशारा ही दिला आहे.

या निवेदनावर भारतीय किसान संघाचे पदाधिकारी तुकाराम चोपडे, बाळासाहेब भोजने, प्रकाश कुलकर्णी, अशोक तौर, भीमराव शिंदे, ज्ञानेश्वर घोलप, काशिनाथ आदमोरे, अशोक मस्के, भास्कर आगे, गोवर्धन कर्डिले, साधू जाधव, सौ.प्रेमाताई यादव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# खांडे पारगाव येथे टुकूर नदीत तहसीलदार शेळके यांच्या हस्ते मोफत वाळूचे वितरण

## घरकुलधारकांनो चिंता नको ; शासन मोफत वाळू वाटप

"घरकुल उभं राहावं , भिंतींना आधार मिळावा ,
गरीबाच्या घरावर वाळूचा भार न पडावा..."

या भावनेतून राज्य शासनाने राबविलेली मोफत वाळू वितरणाची योजना बीड जिल्ह्यात प्रभावीपणे आकार घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे .

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या वाळू धोरणाची अंमलबजावणी बीड जिल्ह्यात काटेकोरपणे सुरू असून, ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना थेट दिलासा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न प्रत्यक्ष जमिनीवर उतरल्याचे दिसून येत आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे वेळोवेळी विभागस्तरावर आढावा घेत मार्गदर्शन करत असून, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हास्तरावर संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवत सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क साधून वाळू उपलब्धता, प्रस्ताव व वितरण याबाबत समन्वय साधला आहे.

बीड तालुक्यात घरकुल योजनेंतर्गत एकूण २५ हजार ३५३ लाभार्थी उद्दिष्ट असून त्यापैकी २३ हजार ३८६ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. पहिल्या टप्प्यात १९ हजार ८७५ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळालेला असून सध्या



सुमारे ७ हजार १०० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या घरकुल बांधकामासाठी वाळू ही अत्यावश्यक बाब असल्याने मोफत वाळू वितरण योजना ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

बीड तालुक्यात दहा वाळू घाट निश्चित - बीड तालुक्यासाठी दहा वाळू घाट निश्चित करण्यात आले असून सिंधफणा नदीपात्रातील विविध ठिकाणी हे घाट आहेत. रंजेगाव, रामगाव, बऱ्हाणपूर, आडगाव, कुक्कडगाव, खुंड्रस , साक्षाळ पिंपरी आदी ठिकाणी वाळू उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय अंधापुरी, पिंपळादेवी, नागापूर बु., खांडे पारगाव , पारगाव सिरस या गावांमध्ये नव्याने नोंदणी केलेले प्लॉट असून येथून वाळू उपलब्ध करून देण्यात येत आहे .

खांडे पारगाव येथे प्रत्यक्ष वितरण - या पार्श्वभूमीवर बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी बीड तालुक्यातील अथरवन पिंपरी जवळील टुकूर नदीपात्रात खांडे पारगाव येथील घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वितरण करण्यात आले. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली.

या वेळी घरकुल लाभार्थी मधुकर तुकाराम सपकाळ व विकास बाबुराव आमटे यांना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत मोफत वाळू वाटप करण्यात आले.

२५ पैकी १२ लाभार्थ्यांना वाळू वाटप पूर्ण - याबाबत माहिती देताना ग्राम महसूल अधिकारी अक्षय ढोपे यांनी सांगितले की, आतापर्यंत एकूण २५ घरकुल लाभार्थ्यांपैकी १२ लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वितरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांनाही टप्प्याटप्प्याने वाळू दिली जाणार आहे . सध्या सुमारे ६०० ब्रास वाळूचे वितरण होणार असून, ज्या ठिकाणी वाळू उपलब्ध आहे तेथील प्रस्ताव तात्काळ दाखल करण्याच्या सूचना ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांचा सहभाग - या वेळी खांडे पारगाव गावचे उपसरपंच अनील आबा आमटे , दत्ता सुरवसे, नवनाथ बापू सपकाळ, रवींद्र सपकाळ तसेच अथरवन पिंपरी येथील उपसरपंच अशोक शिंदे, प्रवीण शिंदे, अमोल शिंदे यांच्यासह घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून प्रशासनास सहकार्य करत हा उपक्रम यशस्वी केला.

यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके म्हणाले,

" बीड तालुक्यातील लहान नद्या, ओढे, नाले यामध्ये नैसर्गिकरित्या साठणारी वाळू शासन धोरणानुसार घरकुलधारकांना मोफत देण्यात येणार आहे. यामुळे अवैध वाळू उपसा थांबेल आणि गरजू नागरिकांना थेट लाभ मिळेल. "

"घरकुलासाठी वाळू मिळवणे आमच्यासाठी मोठी अडचण होती. प्रशासनाने थेट नदीपात्रातून वाळू उपलब्ध करून दिल्यामुळे आमचा खर्च वाचला," अशी प्रतिक्रिया एका लाभार्थ्याने व्यक्त केली. गावकऱ्यांनी प्रशासन व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले.

ग्रामीण घरकुलांसाठी दिलासादायक उपक्रम - एकीकडे अवैध वाळू वाहतुकीवर कठोर कारवाई आणि दुसरीकडे शासन निर्णयानुसार पारदर्शक पद्धतीने मोफत वाळू वाटप — या दोन्ही बाबींचा समतोल राखत बीड जिल्ह्यात प्रशासन काम करत असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले आहे.

"घर बांधणं स्वप्न नाही ,
योग्य हात मिळाले तर सत्य होतं..."

ग्रामीण भागातील घरकुलधारकांसाठी हा उपक्रम निश्चितच दिलासादायक ठरणार असून, पुढील काळातही शासन धोरणानुसार अशीच कार्यवाही सुरू राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरच्या महापौर - उपमहापौरांनी स्वीकारला पदभार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या नूतन महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर एड. स्नेहल उटगे यांनी मंगळवारी आपला पदभार स्वीकारला. यावेळी आमदार अमित देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

लातूर मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीत आ. अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस - वंचित बहुजन आघाडीने ७० पैकी ४७ जागा जिंकून मंडपावर निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. यामध्ये एकट्या ४३ जागा जिंकण्याचा पराक्रम काँग्रेसने केला आहे. मागच्या मनपा निवडणुकीत ३६ जागा जिंकून सत्ता मिळवणाऱ्या भाजपाला या निवडणुकीत मात्र केवळ २२ जागांवर समाधान मानावे लागले. नूतन महापौर - उपमहापौर यांनी आपल्या नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत पदभार स्वीकारताना आपल्यावर विश्वास टाकणाऱ्या आ. अमित देशमुख यांच्या तसेच सामान्य लातूरकरांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करू असे सांगितले. नूतन पदाधिकाऱ्यांचा आ. अमित देशमुख यांनी शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आ. अमित देशमुख यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना काँग्रेसच्या नेतृत्वात लातूर शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आपण आणि आपले सर्व सहकारी नगरसेवक प्रयत्नशील राहू,असे आश्वासन दिले. यावेळी मनपा आयुक्त मानसी मीना यांच्यासह मनपाचे सर्व अधिकारी - कर्मचारी, विद्यमान नगरसेवक तसेच माजी पदाधिकारी उपस्थित होते.



# विविध वृत्त...

## आज जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत कायदेविषयक मार्गदर्शन

**लातूर :** जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी, माजी सैनिक विधवा व त्यांचे अवलंबित यांच्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत बुधवार, ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर हे यावेळी महसूल विषयक, कौटुंबिक वादविवाद संदर्भातील अडीअडचणी जाणून घेण्यासाठी, त्यावर योग्य ते कायदेविषयक मार्गदर्शन व आवश्यक ती मदत करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबित यांनी लातूर जिल्हा सैनिक कार्यालय येथे आवश्यक त्या कागदपत्रासोबत उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## राजमाता जिजामाता संकुलातर्फे प्राचार्या शुभांगी काळे यांचा सत्कार

**लातूर :** येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या संचालकपदी प्राचार्या शुभांगी विक्रम काळे यांची निवड झाल्याबद्दल राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सोमवारी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते आमदार विक्रम काळे आणि प्राचार्या शुभांगी काळे यांचा सत्कार करण्यात आला. शिवछत्रपती शिक्षण संस्था आणि राजर्षी शाहू कॉलेजचे नाव शिक्षणातील आगळ्या वेगळ्या पॅटर्नमुळे देशभरात गाजत आहे. मी राजर्षी शाहू महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. आज या संस्थेची संचालक म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली आहे, ही माझ्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे, असे सांगून संस्था आणि कॉलेजच्या प्रगतीसाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही प्राचार्या शुभांगी काळे यांनी दिली. प्राचार्या शुभांगी काळे यांना शिक्षण क्षेत्रातील कामाचा चांगला अनुभव आहे. या अनुभवाच्या जोरावर त्या शिक्षण क्षेत्रात उत्तम कामगिरी करतील, असे आमदार विक्रम काळे म्हणाले. तर प्राचार्या शुभांगी काळे यांच्या या निवडीमुळे मुलींचे प्रश्न मार्गी लागतील व 'शाहू पॅटर्न'ला चांगली दिशा मिळेल, असा विश्वास प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी व्यक्त केला. यावेळी शांताबाई वसंतराव काळे, कवि योगीराज माने, विपुल काळे, राजमाता जिजामाता विद्यालयाचे समन्वयक राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते.

## दयानंदमध्ये सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड

**लातूर :** दयानंद कला महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ करिता सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या माध्यमातून महाविद्यालयात विविध समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या अनमोल मार्गदर्शनानुसार सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ.रामेश्वर खंदारे यांनी मुलाखतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे कलागुण व कौशल्य पाहून या अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची शै. वर्ष २०२५ - २६ करिता निवड केली. याप्रसंगी प्रा.स्फूर्ती समुद्रे प्रा. चैतन्य शिंदे यांचेही अनमोल सहकार्य लाभले. या अभ्यास मंडळाचे नुतन अध्यक्ष म्हणून वसंत कुलकर्णी, उपाध्यक्ष कामाक्षा मुदाळे, सचिव त्रिमुख इगवे, कोषाध्यक्ष विमल पाल, सोशल मिडीया संयोजक देवांश पाचंगे ,प्रसिद्धी प्रमुख विशाल भांगुरे, कलामंच प्रमुख निलेश वाघमारे, तसेच सदस्य म्हणून सोनिया कांबळे ,स्वाती जाधव ,अमृता काळे, अश्विनी चव्हाण, शुभम जानापुरे ,अभिषेक ठाकूर यांची निवड करण्यात आली.

# 'कचरा मुक्त लातूर'साठी यशस्वी लढा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** लातूर शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित व्हावे, ही केवळ घोषणा न ठेवता ती प्रत्यक्षात उतरवण्याचे काम गेल्या साडेसहा वर्षांपासून अखंड २४४६ दिवस 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन' निःस्वार्थपणे करत आहे. कचरा मुक्त लातूर हे स्वप्न साकारण्यासाठी फाउंडेशनने सुरू केलेला हा सामाजिक लढा आज शहरासाठी प्रेरणादायी,यशस्वी ठरत आहे.



वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनासोबतच शहर स्वच्छतेसाठी सुरू असलेल्या या अभियानात मागील साडेसहा वर्षांत तब्बल १२४ ठिकाणी स्वच्छता मोहिमा राबवण्यात आल्या आहेत. या सर्व मोहिमांची तारीख व ठिकाणानुसार सविस्तर यादी जाहीर करण्यात आलेली असून, हे कार्य केवळ आकडेवारीपुरते मर्यादित नसून त्यामागे समाजाप्रती असलेली जबाबदारीची भावना स्पष्टपणे दिसून येते.

लातूर शहरातील सर्व प्रमुख दुभाजक (डिव्हायडर) ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या सदस्यांद्वारे ✻वारंवार स्वच्छ करण्यात आलेले आहेत. विशेषतः पावसाळ्यात दुभाजकांमध्ये वाढलेले गवत काढून ते स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी फाउंडेशनच्या सदस्यांनी सातत्याने पार पाडली आहे. याशिवाय शहरातील विविध ग्रीन बेल्ट, मंदिरे, सार्वजनिक ठिकाणे, तसेच मोकळे प्लॉट येथे साचलेला कचरा काढून स्वच्छता करण्यात आली. अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे कचऱ्याचे ढीग असलेली ठिकाणे आज स्वच्छ व देखणी दिसत आहेत.विशेष सामाजिक उपक्रमांतर्गत भित्तीपत्रके मुक्त लातूर ही मोहिम राबवण्यात आली. शहरातील अनेक भिंतींवर बेकायदेशीररीत्या चिकटवलेली जाहिरातीची पत्रके काढून भिंती स्वच्छ करण्यात आल्या, ज्यामुळे शहराच्या सौंदर्यात लक्षणीय बदल झाला.

शहरात कचरा रस्त्यावर व मोकळ्या जागेत टाकला जाण्याचे मूळ कारण शोधताना, अनेक लहान व्यापारी, पानपट्टी चालक, फेरीवाले व छोटे व्यावसायिक यांच्याकडे कचरा साठवण्यासाठी पेट्याच नसल्याचे लक्षात आले. या समस्येवर ठोस उपाय म्हणून आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन तर्फे ७०० पेक्षा अधिक कचरा पेट्यांचे मोफत वितरण करण्यात आले. हा उपक्रम 'कचरा मुक्त लातूर' च्या दिशेने टाकलेला एक महत्त्वाचा पाऊल ठरला आहे.

आपल्याकडे प्रतिवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. अनंत चतुर्दशी दिवशी गणरायाच्या विसर्जनासाठी विहिरी व नद्यांकडे मोठी गर्दी होत असते. मात्र यामुळे पाण्याचे प्रदूषण व निर्माल्यांच्या प्लास्टिक पिशव्यांमुळे पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होतो. ही बाब लक्षात घेऊन आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन च्या सदस्यांनी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी निर्माल्य संकलन केंद्र उभारले. तसेच ताडपत्रीचा वापर करून पर्यावरणपूरक हौद प्रतिवर्षी तयार केला जातो. याच हौदामध्ये गणेशमूर्ती विसर्जन करण्याचे आवाहन लातूरकरांना केले जाते. प्रतिवर्षीच या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवतात. आज या सर्व कार्यामुळे ✻सामान्य लातूरकर ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या कार्याचे मनापासून कौतुक करत आहेत. कोणतीही प्रसिद्धी, आर्थिक लाभ किंवा राजकीय पाठबळ न घेता सुरू असलेले हे कार्य शहरातील नागरिकांना स्वच्छतेसाठी पुढे येण्याची प्रेरणा देत आहे.

## रेणापुरात काँग्रेस २, भाजप - मनसे १ जागेवर विजयी

**तभा वृत्तसेवा/ईश्वर बद्दर**

**रेणापूर, दि. १० फेब्रुवारी :** रेणापूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या चार गटासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली त्यामध्ये कॉग्रेसचे दोन,भाजपचा एक, मनसेचा एक उमेदवार विजयी झाले आहेत. तर पंचायत समितीच्या आठ गणात भाजप तीन, कॉग्रेस तीन, तर मनसेचे दोन उमेदवार विजयी झाले.



जिल्हा परिषद चार गटाचे विजयी उमेदवार पानगाव मनसेचे डॉ. सुनील नागरगोजे, खरोळा सौ.शिवकन्या महेंद्र गोडभरले,पोहरेगाव सौ.मनीषा गंगासिंह कदम कामखेडा सौ. आशाताई शिवाजीराव भिसे या विजयी झाल्या. पंचायत समिती पानगाव गणातुन मनसेच्या सौ. श्रीदेवी प्रकाश गालफाडे, कोष्टगाव गणातून मनसेच्या सौ.मोनिका रवी सूर्यवंशी, कारेपुर गणातून भाजपाच्या सौअंजली राजेश काळे, खरोळा गणातून भाजपाच्या सौ.शितल प्रताप राऊतराव कामखेडा गणातून भाजपचे शरद दरेकर, मोटेगाव गणातून कॉग्रेसचे उद्धव जाधव, पोहरेगाव गणातून काँग्रेसचे तात्याराव वाघमारे, निवाडा गणातुन काँग्रेसचे बालाजी गोटके विजयी झाले.

जिल्हा परीषद पानगाव गटातून उमेदवाराना मिळालेली मते : मनसेचेडॉ सुनील नागरगोजे ७८०६ मते घेऊन विजयी झाले, कॉग्रेसचे गणेश तुरूप ४६१५ मते घेतली,भाजपाचे सतीश आंबेकर ४२१५ मते, खरोळा जिल्हा परिषद गट भाजपच्या उमेदवार सौ.शिवकन्या महेंद्र गोडभरले या ९३६८ मते घेऊन विजयी झाल्या तर कॉग्रेसच्या सौ रुपाली विलास भोसले यांना ८११३ मते मिळाली. कामखेडा जिल्हा परिषद गटातुन कॉग्रेसच्या उमेदवार सौ.आशा शिवाजी भिसे ६८७१ मते घेऊन विजयी झाल्या तर भाजपच्या सरीता शंकर भिसे यांना ६८६९ मते मिळाली तर शिदे सेनेच्या उमेदवार आशा राजेंद्र दाणे यांना ३६३७ मते मिळाली. पोहरेगाव जिल्हा परिषद गटाच्या कॉग्रेसच्या उमेदवार सौ मनिषा गंगासिंह कदम ९९४८ मते होऊन विजयी झाल्या तर भजप च्या सौ. मनिषा दशरथ सरवदे यांना ८६०६ मते मिळाली.

## विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वृध्दीसाठी दयानंद महाविद्यालयात गुलाब पुष्पाने स्वागत



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** बारावी बोर्ड परीक्षेच्या तणावातून विद्यार्थ्यांनी मोकळा श्वास घ्यावा तसेच आनंदी, तणावमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडाव्यात, या उद्देशाने दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालयात प्रति वर्षाप्रमाणे बारावी बोर्ड परीक्षार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन उत्साहात स्वागतपर कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्य तथा केंद्र संचालक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष ललितभाई शाह व सचिव रमेश बियाणी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. हळुवार सुमधुर बासरीचे सूर, रंगीबेरंगी रांगोळ्यांची आकर्षक आरास, विविध फुग्यांनी सजवलेला परिसर व प्रवेशद्वार यामुळे संपूर्ण महाविद्यालयाचा परिसर मंगलमय झाला होता. या प्रसन्न वातावरणात बारावी बोर्ड परीक्षार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

या स्वागत समारंभासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तृप्ती अंधारे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आत्मविश्वासाने परीक्षा देण्याचा सल्ला दिला. परीक्षेबाबत काही विद्यार्थ्यांच्या मनात अनामिक भीती व हुरहुर असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावणे, आत्मविश्वास वाढवणे तसेच तणावमुक्त व भीतीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठीच हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, प्रा. डॉ. दयानंद शिरूरे अधिक्षक श्री संजय व्यास,माजी राज्य मंडळ सदस्य डॉ. संदीपान जगदाळे, डॉ. गोपाल बाहेती, प्रा. जिगाजी बुद्रुके, प्रा. सुधीर गाडवे, प्रा. दशरथ ननावरे व,प्रा महेश जंगापल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

## बारावी परीक्षेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे बारावी बोर्ड परीक्षेच्या पहिल्या दिवशी परीक्षा केंद्रावर संस्था आणि महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे प्रवेशद्वारावर गुलाब पुष्प देऊन मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शुभेच्छा देत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा तणाव कमी होऊन आत्मविश्र्वास वाढल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. परीक्षेसाठी आवश्यक सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून देत शिस्तबद्ध नियोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे सचिव शाम देशमुख यांनी यावेळी दिली.

भयमुक्त आणि तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी विद्यार्थ्यांना केले. परीक्षा ही तुमच्या ज्ञानाची चाचणी आहे, भीती निर्माण करणारी प्रक्रिया नव्हे. आत्मविश्र्वास ठेवा, वेळेचे योग्य नियोजन करा आणि शांत मनाने प्रश्नपत्रिका सोडवा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःवरील विश्र्वास यामुळे यश निश्र्चित मिळते, असे सांगत प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल यशासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. परीक्षा केंद्रप्रमुख म्हणून प्रा. विवेक कदम, प्रा. सोपान डोपे, हनुमंत शिंदेहे काम पाहत आहेत.

यावेळी गणेश देशमुख,मुख्याध्यापक आरडी गायकवाड, पांडुरंग चेवले, डॉ. शहराज मुळे, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. महवीर कटके, डॉ. माना गायकवाड, प्रा. संदिपान चेवले, डॉ. विवेक जाधव, डॉ. अंगद कोते, डॉ. अजित भांजी,डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ. कांतराव पोले, डॉ. पांडुरंग मुंढेयांनीही विद्यार्थ्यांना परीक्षा करिता शुभेच्छा दिल्या.

**शैक्षणिक कागदपत्रे हरवली आहेत**

अनुराग संजय बेंबडे या नावाची पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, लातूरची दहावी पासची टी.सी., गुणपत्रिका व सनद तसेच कमला नेहरू महाविद्यालय, बोरी, ता.जि . लातूर ची बारावी पासची टी.सी., गुणपत्रिका व सनद ही महत्वपूर्ण शैक्षणिक कागदपत्रे रेणापूर - लातूर मोटारसायकल प्रवासात हरवले आहेत. ज्यांना सापडली असल्यास त्यांनी कृपया पुढील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क : ८९९९८ ४१४३४**

## स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्यावतीने डॉ.अभय बंग यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** येथील स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेच्या वतीने बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी 'आरोग्य-स्वराज्य' या विषयावर डॉ. अभय बंग यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.



आपल्या मनातील महाराष्ट्राच्या नकाशात गडचिरोली ची दखलसुद्धा असत नाही. अधिकाऱ्यांना ती काळ्यापाण्यापेक्षा भयाण शिक्षा वाटते. अशा आदिवासी, दरिद्री आणि दुर्गम भागात, गेल्या ४१ वर्षांपासून डॉ.अभय व डॉ. राणी बंग हे दांपत्य वैद्यकीय सेवा देत आहेत. आदिवासी भागात बालपणातील कुपोषणामुळे त्यांच्या आरोग्याची दैना उडते. बालकांची वाढच व्यवस्थित होत नाही, बालपणातच असंख्य रोग जडतात. हे सिध्द करून बंग दांपत्यांनी कुपोषणाच्या जीर्ण समस्येला राष्ट्रीय पातळीवर आणले. त्या भागातील सर्वसामान्यांनाच आरोग्यदूत३९;करून बालमृत्यू रोखण्यासाठी कृतीआराखडा अंमलात आणला. त्यांच्या शोधनिबंधांचा जगभर सन्मान झाला. त्यांनी सुचवलेल्या उपाययोजनांना जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ यांनी स्वीकारले आहे.

डॉ.अभय व डॉ. राणी बंग यांचे शोधग्राम हे , संपूर्ण देशातील सामाजिक कार्यकर्त्यांसाठी स्फूर्तीस्थान झाले आहे. मी मी आणि केवळ मीमध्ये रममाण होत चाललेल्या तरूणांनी सामाजिक कार्याची जबाबदारी का व कशी घ्यावी? याचे प्रशिक्षण देण्याकरिता डॉ. बंग यांनी निर्माण उपक्रम चालू केला आहे. त्यातून शेकडो कार्यकर्ते तयार झाले असून ते देशभर कार्यरत आहेत. एकाच वेळी संशोधन आणि वैद्यकीय सेवा देत असलेले डॉ. बंग हे आरोग्य विचार सर्वदूर पोहोचवण्यासाठी लेखनही करत आहेत. त्यांनी 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' मधून हृदयविकाराचा झटका आणि तो रोखण्यासाठी जीवनशैली कशी असावी? हे सांगितले. 'सेवाग्राम ते शोधग्राम' या

पुस्तकातून त्यांचा वैयक्तिक प्रवास आणि त्यांचे कार्य उलगडून दाखवले. तरुणांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे 'या जीवनाचे काय करू?' या पुस्तकातून सुचवली. त्यांचे 'आरोग्य-स्वराज्य' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यांनी 'आपण आजार होण्याआधी आरोग्य कसे जपावे? आजार झालाच तर जवळ, स्वस्त उपचार देण्यासाठी आरोग्य धोरण कसे असावे?' यांवरील सखोल चिंतन मांडले आहे. ही संकल्पना स्पष्ट करून संवाद साधण्यासाठी, ते लातुरात येत आहेत.

११ फेब्रुवारी २०२६ (बुधवार ) रोजी सायंकाळी ५.३० वाजता, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या 'कस्तुर-कंचन' सभागृहात डॉ. अभय बंग हे 'आरोग्य-स्वराज्य' यावर विचार मांडणार आहेत. लातूरकरांनी अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्यावतीने श्रीनिवास लाहोटी, सुमती जगताप,डॉ.अजित जगताप आणि अतुल देऊळगावकर यांनी केले आहे.

**जाहिर प्रगटन** **दै.तरुण भारत**

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते कि , माझे पक्षकार **क्षिरसागर सुहास लक्ष्मण , रा. हिप्परगा ता.औसा जि लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरून सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहिर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **सौ विद्या आण्णासाहेब पवार , रा. फादर मायकेल सोसायटी ,विश्रांतवाडी ,पुणे** यांनी खरेदी खत दस्त क्र. ल. त. र – २-६३००/२००९ अन्वये खरेदी मालकीचा व कब्जेवाहिवाटीचा खुला प्लॉट मौ. चांडेश्वर ता. जि लातूर येथील जमीन गट नं ६० मधील खुला प्लॉट ज्यांचा एन. ए नं. २००६/जे . एम . बी /लातूर /सी . आर -८५७ ,दि- ०५/१२/२००६ ई . अन्वये मे. सब डिव्हीजनल ऑफिस ,लातूर यांनी मंजूर केलेला खुला प्लॉट याचा ले आऊट क्र. एल . टी. आर/एन. ए /सर्वे नं ६०/लातूर /एन. आर. एल/१७६३, दि.२७/११/२००६ ई. अन्वये मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा खुला प्लॉट नं.८१(पूर्ण) याची लांबी पूर्व –पश्चिम १७ मी व रुंदी दक्षिण-उत्तर १२ मी . याचे एकूण क्षेत्रफळ २०४. चौ.मी आहे. प्लॉट चतु:र्सिमा - पुर्वेस - गट ६१ मधील जमीन, पश्चिमेस – ९ मी रुंदीचा रस्ता , दक्षिणेस - प्लॉट क्र ८२ उत्तरेस – प्लॉट क्र ८०

येणे प्रमाणे वरील चतु : सिमेच्या आतील मिळकत खरेदी करणेचा **लेखी** करार केला असुन ठरावापोटी ईसारा रक्कम दिलेली आहे तसेच सदरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखिम असल्याची हमी विध्यमान मालकाने माझ्या पक्षकारास दिलेली आहे तरी सदर मिळकतीवर जर कोणाचा उजर , हक्कसंबंध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीस, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लिज, लिन, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन **सात ( ७ )** दिवसांचे आत माझ्या खालील पत्यावर लेखी आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर आक्षेप आला नाही तर सदरील मिळकत ही निर्विवाद व निर्जोखिम समजुन माझे पक्षकार नोंदनिकृत खरेदीखत करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक - ०२/०२/२०२६

तर्फे. ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक, लातूर
मो. न. ९४२१९८६४९५

जाहिर प्रगटन देणार
क्षिरसागर सुहास लक्ष्मण
**रा. हिप्परगा ता.औसा जि लातूर**
मो.नं.८६०५५५६५६७ / ७७७४८७२१४६

**जाहीर प्रगटन** दै.

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **खमरोद्दीन महमदसाब शेख, रा.बरकत नगर, लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **राजाभाऊ शंकरप्पा राजनाळे**, रा.राजे शिवाजी नगर, पाखरसांगवी, ता.जि.लातूर यांनी प्लॉटचे मुळ मालक भास्कर बाजीराव वाडीकर यांचे कडून ठरावपत्र करुन घेतलेल्या पैकीचा प्लॉट जो की, मौ.साखरा, ता.जि.लातूर येथील जमीन गट क्रं.१०९ पैकीचा प्लॉट क्रं. २१ चा पश्चिम भाग याची लांम्ब्री पुर्व — पश्चिम २५ फुट व रुंदी दक्षिण - उत्तर ३८.५ फुट याचे एकूण क्षेत्रफळ ९६२.५ चौ.फुट असून याची चतु : सीमा खालील प्रमाणे :-
पुर्वेस - सदर प्लॉट क्रं.२१ चा प्लॉटचा उर्वरीत भाग, पश्चिमेस - प्लॉट क्रं.२२, दक्षिणेस - प्लॉट क्रं.१९, उत्तरेस - १२ मी. रुंदीचा रस्ता.

येणे प्रमाणे वरील चतु:सीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन **लेखी** करार करुन घेऊण,इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर,आक्षेप,हितसंबंध,हक्कसंबंध,कर्जबोजा,गहाणखात,बक्षीसपत्र,कोर्ट डिग्री,मृत्युपत्र,तारण,लीज,शेजाऱ्याचा वाद,शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून **सात ( ०७ )** दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक - १०/०२/२०२६

तर्फे ॲड.अशोक ज्ञा.लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक,लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**खमरोद्दीन महमदसाब शेख,**
**रा.रा.बरकत नगर, लातूर**
मो नं.९८५०८३६८८७/९८३०१०६६५८

# भानगडी करणाऱ्यांना बाजूला करणार: खा. अशोक चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० फेब्रूवारी-**

मी जे बोलतो ते करतोच त्यामुळे माझ्यावर विश्वास ठेवुन जनतेने तुम्हाला निवडुन दिले आहे. म्हणुन भनगडी न करता विकासकामे करा अन्यथा भानगडी करणणाऱ्यांना बाजुला करणार असा इशारा खा. अशोक चव्हाण यानी दिला.

महापौर, उप महापौर निवडीनंतर आयाजीत पदग्रहन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी खा. अजित गोपछडे, आ.बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, शहराध्यक्ष अमर राजुरकर, संतुक हंबर्डे, प्रविण साले यांची उपस्थिती होती. नांदेडमध्ये काय चालते याची सर्व माहिती मला मिळत असते. तेंव्हा नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर आणि नगरसेवकांनी कोणत्याही भानगडी न करता अत्यंत पारदर्शकपणे व लोकाभिमुख कारभार चालवून महानगरपालिकेच्या कामकाजाच्या पावत्या जनतेने दिल्या पाहिजेत. यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन खा. अशोक चव्हाण यांनी केले.

आज महापौर पदाची निवडणुक पार पडली त्यात भारतीय जनता पार्टीच्या सौ. कविता संतोष मुळे यांचा विजय झाला. उपमहापौर पदी भारतीय जनता पार्टीचे



दिपकसिंह काशिनाथसिंह रावत यांची निवड झाली. सभागृहनेते पदी महापौरांनी ऍड. महेश कनकदंडे यांची नियुक्ती केली. या प्रसंगी सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते. तसेच जनताही उपस्थित होती.

पुढे बालताना खा. अशोक चव्हाण म्हणाले की, महानगरपालिकेतील महापौर, उपमहापौर आणि नगरसेवकांनी कामे लवकर सुरू करा, हळू चाला आणि सुरक्षीत पोहचा या तत्वावर काम करण्याची गरजआहे. नांदेडमध्ये काय घडते याची सर्व इत्यंभूम माहिती मिळत असते तेंव्हा कोणीच भानगडी करू नका, पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन ठेवा आणि आपले उत्तरदायित्व स्विकारा असा सल्ला अशोक चव्हाण यांनी दिला.

यावेळी खा. अजित गोपछडे, आ.बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर,महापौर कविता मुळे, उपमहापौर दिपकसिंह रावत यांचीही भाषणे झाली.

# आमदार भिमराव केराम यांच्या हस्ते संपूर्णता अभियान २.० चा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १० फेब्रूवारी-**

केंद्र सरकार नीती आयोगाच्या महत्वाकांक्षी आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत किनवट तालुका समाविष्ट असून यात एकूण ४० निर्देशकांचा समावेश करण्यात आलेला आहे. मागील वर्षी जुलै ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत संपूर्णता अभियान राबविण्यात आला, यातील मिळालेल्या यशानंतर केंद्र सरकारच्या नीती आयोगाने सध्या २८ जानेवारी ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत संपूर्णता अभियान २.० अभियानाची सुरुवात केली असून यात आरोग्य-पोषण, शिक्षण आणि कृषी-पशुसंवर्धन या क्षेत्रांतर्गत ६ निर्देशक समाविष्ट करण्यात करण्यात आले आहेत जे कि १४ एप्रिल २०२६ पर्यंत १०० टक्के पूर्ण करावयाचे आहेत.

याचाच एक भाग म्हणून आमदार भिमरावजी केराम यांच्या हस्ते आज किनवट येथील पंचायत समिती सभागृहात सदर अभियानाचा तालुकास्तरीय शुभारंभ करण्यात आला. यावेळी संजय राठोड माजी सभापती (समाजकल्याण), दत्ता भाऊ आडे माजी सभापती पंचायत समिती, मा. आमदार महोदयांचे स्वीय सहाय्यक संतोष मरसकोल्हे, प्रशांत थोरात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा), जयश्री वाघमारे गटविकास अधिकारी, संतोष बघेले उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा, डॉ.के पि गायकवाड तालुका आरोग्य अधिकारी, अनिल महामुने गटशिक्षणाधिकारी, शिवाजी जामोदे बालविकास प्रकल्प अधिकारी, उमेश धोंड पशुधन विकास अधिकारी (विस्तार), विस्तार अधिकारी वसंत वाघमारे, निवृत्ती मूकनर वरिष्ठ सहाय्यक राजेश म्याकलवार हे उपस्थित होते.

यावेळी आमदार महोदयांनी सदर



अभियानात समाविष्ट निर्देशांक १०० टक्के संप्रूक्त करण्यासाठी अधिक गतीने काम करावे, यासाठी विविध विभागाशी समन्वय ठेवून निर्धारित उद्दिष्ट साध्य करावे, अधिक प्रभाविपणे काम करून तालुक्याचे नाव दैदिप्यमान करणाऱ्या विभागांचा व संबंधित अधिकारी कर्मचारी यांचा सन्मान करण्यात येईल यासाठी सर्वांनी सदर महत्वाकांक्षी कार्यक्रमात सर्वांनी पुढे येऊन योगदान द्यावे असे आवाहन केले आहे.

प्रशांत थोरात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही संबंधित निर्देशांक कसे पूर्ण करता येईल यासाठी सखोल मार्गदर्शन केले आणि आरोग्य विभाग व महिला बालविकास व ग्रामपंचायत विभाग यांच्या समन्वयाने हे सहज शक्य आहे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांनी केले, सदर प्रस्ताविकेतुन त्यांनी यंत्रणानिहाय समावेशित निर्देशकांची माहिती दिली व एकंदरीत उपस्थितांना सदर कार्यक्रमाचा परिचय करून दिला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकांक्षित कार्यक्रमाचे समन्वयक पांडुरंग मामीडवार यांनी केले तर आभार विस्तार अधिकारी निवृत्ती मूकनर यांनी मानले.

सदर शुभारंभ कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, सहा.प्रशासन अधिकारी टोम्पे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी अल्केश शिरसेटवार, सर्व विस्तार अधिकारी, ठऋड तालुका व्यवस्थापक अभिजित गरड, कनिष्ठ सहाय्यक अंकुश राठोड, सर्व अंगणवाडी पर्यवेक्षिका, पशुधन विकास अधिकारी, सर्व पशुवैद्यकीय कर्मचारी, अंगणवाडी सेविका, सर्व कार्यालयीन कर्मचारी यांची उपस्थिती होती.

**तालुका कक्ष वॉर रूमची केली पाहणी**

आमदार महोदयांनी यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियांन अंतर्गत पंचायत समिती स्तरावर प्रचार प्रसिद्धी व योजणांच्या सार्वत्रिकिकरणासाठी तयार करण्यात आलेल्या वॉर रूमची ही यावेळी पाहणी करून शुभेच्छा दिल्या.

**पोषण आहार जनजागृती स्टॉलचे उदघाटन**

यावेळी आमदार यांनी ICDS विभागाने संपूर्णता अभियानाच्या शुभारंभाचे औचित्य साधून तयार केलेल्या पोषण आहार जनजागृती संदर्भात तयार केलेल्या स्टॉल ला भेट देऊन पाहणी केली व विभागाचे कौतुक केले.

## अनिल दस्तूरकर यांची मुख्याध्यापक पदी पदोन्नती

**हदगाव** -आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयातील विद्यार्थीप्रिय व उपक्रमशील शिक्षक अनिल



दस्तूरकर यांना संस्थेने सेवाजेष्ठतेनुसार संस्थेचे सचिव सुनील सोनुले यांनी मुख्याध्यापकपदी पदोन्नती दिली आहे. २८ वर्ष शिक्षक,नंतर उपमुख्याध्यापक म्हणून त्यांनी अखंड सेवा केली आहे. ते शिस्तप्रिय आणि उपक्रमशील शिक्षक म्हणून जिल्ह्यात सर्वत्र ओळखल्या जातात. आपल्या विषयाच्या निकालाचा आलेख दरवर्षी त्यांनी चढता ठेवला आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन मुंबई येथे एका मोठ्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांना राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार ही प्रदान करण्यात आला आहे. शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना एका दैनिका मार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो तो पुरस्कार ही जिल्ह्याचे पोलीस महाअधिक्षक शहाजी उमाप यांच्या हस्ते दस्तूरकर यांना देवून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. अनिल दस्तूरकर यांना मुख्याध्यापक पदी पदोन्नती मिळत्याने तालुक्यात शिक्षण व अनेक क्षेत्रातील मान्यवरातर्फे अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## केसराळी जि.प.शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम रंगले

**तभा वृतसेवा**
**आदमपूर ,दि. १० फेब्रूवारी-**

बिलोली तालुक्यातील केसराळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता शाळेचे मु.अ.शेख सलीम जमनसाब यांच्या नेतृत्वात सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.

येथील महिला सरपंच माधुरी मनधरने यांच्या हस्ते सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्धाटनानंतर सहभागी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, लोकगीते, लावण्या, देशभक्तीपर,ऐतिहासिक गीते व नाटिका आशा वैविध्यपूर्ण गाण्यांवर उत्कृष्ट नृत्य सादर करीत उपस्थित रसिक पालक व गावकऱ्यांकडून वाहवा मिळविली!कार्यक्रमास केंद्रप्रमुख शंकर नाईक, शा.व्य.समितीचे अध्यक्ष सातप्पा मुद्दलवार, उपाध्यक्ष नागनाथ गायकवाड, सरपंच प्रतिनिधी राजू मनधरने, चेअरमन दिपक शिंदे, माजी सरपंच दत्ता पाटील माडे, माजी सरपंच विनोद फकीरे, पोलीस पाटील सायलू पांचाळ, तंटामुक्ती अध्यक्ष पवन फकीरे, राष्ट्रवादीचे तालुका कार्याध्यक्ष गणेश शिंदे, दाऊछी रघुपती, प्रकाश भालेरावसह गावातील प्रतिष्ठित नागरिक,पत्रकार उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वितेसाठी मु.अ. सलीम जमनसाब शेख, सहशिक्षिका उज्वला कांबळे आदींनी परीश्रम घतले.

# सिडको परिसरातील सर्व केंद्रावर बारावीच्या परीक्षा सुरळीत

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १० फेब्रूवारी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला दिनांक १० फेब्रुवारी पासून सुरुवात झाली. यामध्ये सिडको परिसरातील सात परीक्षा केंद्रावरून बारावीच्या इंग्रजी विषयाचा पेपर सुरळीत पार पडला तर परीक्षेच्या प्रारंभी कांही परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

सिडको नवीन नांदेड परिसरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालत प्रमाणपत्र परीक्षा दिनांक १० फेब्रुवारी पासून परिसरातील सात परीक्षा केंद्रावरून मोठ्या उत्साहात परीक्षेस सुरुवात झाली. यावेळी शिवशक्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काकांडी येथील परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व पेन देऊन स्वागत करण्यात आले. परिसरातील कुसुमताई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या परीक्षा केंद्रावर पहिल्या दिवशी १९९ विद्यार्थ्यांपकी १९४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ५ विद्यार्थ्यांनी परीक्षेस पाठ फिरवली या केंद्राचे केंद्रप्रमुख भागवत हरे यांनी माहिती दिली. तसेच शिवाजी विद्यालय सिडको येथील परीक्षा केंद्रावर २५७ विद्यार्थ्यांपकी २४९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ८ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर होते. अशी माहिती मुख्याध्यापक साहेबराव देवरे यांनी दिली. तसेच इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको येथील परीक्षा केंद्रावर ३७३ विद्यार्थ्यां पैकी ३६१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर १२ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर होती. अशी माहिती केंद्रप्रमुख सातानुरे एस आर यांनी दिली. तसेच वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी येथील परीक्षा केंद्रावर एकूण २४९ विद्यार्थ्यांपैकी २४७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर २ विद्यार्थी गैरहजर होते. अशी माहिती परीक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख कोतवाल शत्रुघन यांनी दिली. तसेच महात्मा फुले आश्रम शाळा वाघाळा येथील परीक्षा केंद्रावर एकूण ६२१ विद्यार्थ्यांपैकी ६१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ५ विद्यार्थी गैरहजर होते अशी माहिती केंद्रप्रमुख भगवान इंगेवाड व सहाय्यक केंद्रप्रमुख पोहरे बी.पी. यांनी दिली. तसेच शिवशक्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काकांडी येथील परीक्षा केंद्रावर एकूण ४७६ पैकी ४६४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर ६ विद्यार्थी गैरहजर असल्याची माहिती केंद्रप्रमुख पवार पी.जी. व मुख्याध्यापक विपिन जाधव यांनी दिली.

## मुदखेडमध्ये माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**मुदखेड** -मुदखेड शहरात दि.७ फेब्रुवारी रोजी माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्र येथुन करण्यात आली. प्रारंभी तथागत गौतम बुद्ध, डॉ.



बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचरंगी ध्वजास मानवंदना देऊन ध्वजारोहण करण्यात आले. माता रमाई यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक शहरातील मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली. माता रमाई आंबेडकर चौक येथील नामफलकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच, यावेळी सम्राट अशोक यांच्या नामफलकाचे अनावरण उत्साहात पार पडले. रमाई महिला मंडळ यांच्या पुढाकारातून मुदखेड नगरीत पहिल्यांदाच दि.१ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान महिला व मुला मुलींचे स्पर्धात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते स्पर्धेत असंख्य बालबालिका आणि महिलांचा प्रतिसाद मिळाला दि.७ फेब्रुवारी २०२६ रमाई महिला मंडळ यांच्या पुढाकारातून मुदखेड शहरात त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती सुंदर देखाव्यास अतिशय हर्ष उल्हासन संपन्न करण्यात आली. भीम नगर, लुबिंनी नगर, नवी आबादी, अशोक नगर, समता नगर, रेल्वे स्टेशन कॉलनी यांसह सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.या सोहळ्याला भिक्खु शिलरत्न थेरो आणि भिक्खु गगनबोधी यांचे पावन सानिध्य लाभले. तसेच भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलाचे पदाधिकारी, बौद्ध उपासक-उपासिका, तरुण मंडळी आणि बालकांची मोठी उपस्थिती होती.जयंती उत्सव शांततेत पार पडण्यासाठी मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. माता रमाई जयंती निमित्त समस्त महिला मंडळाच्या वतीने विविध स्पर्धा आयोजित केलेल्या होत्या त्या स्पर्धेतिल स्पर्धकांना मा.शंकर लोकडे यांच्या कडून स्मृतिशेष केशवराव शंकरराव लोकडे यांच्या स्मरणार्थ सन्मान चिन्ह देण्यात आले उपा.कल्यानी सिध्दार्थ चौदंते यांच्या कडून स्मृतिशेष जिजाबाई नरहरी चौदंते यांच्या स्मरणार्थ प्रमाणपत्र देण्यात आले त्याच बरोबर ॲड अमोल भुरे मित्र मंडळा कडुन माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखविण्यात आला.

# सहा दिवसातच पोलीस व सैन्य भरती तयारीसाठीचा ट्रॅक तयार ; शेकडो विद्यार्थ्यांना फायदा

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १० फेब्रूवारी-**

लोहा नगर पालिका क्षेत्रातील बेरळी रोड लगत असलेले क्रिडा संकुलाची स्वच्छता करण्यात आली असून' या परिसराची पाहणी केल्या नंतर मैदानावर पोलीस व , सैन्य भरतीची तयारी करणाऱ्यांना तरुण-तरुणीना धावण्यासाठी तात्काळ ट्रॅक तयार करून देण्याचा सूचना संबंधित विभागाला आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिल्या. सहा दिवसातच विद्यार्थ्यांसाठी धावण्याचा ट्रॅक तयार करण्यात आला आहे प्रतापरावांनी तरुणांना दिलेल्या आश्वासनाचीपूर्ती झाली आहे याचे युवकांनी समाधान व्यक्त केले

विधानसभा निवडनुक व त्यानंतर लोहा नगर पालिका निवडणूकीत आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोहा शहरात क्रीडा संकुलाचे अद्यावतीकरण करण्याचे आश्वासित केले होते त्यादृष्टीने आता आश्वासांपूर्ती करण्यासाठी प्रत्यक्ष कामाची सुरुवात झाली मागील आठवड्यात ४ फेब्रुवारी रोजी तालुका क्रीडा संकुलाची



आ चिखलीकर यांच्या सोबत नगराध्यक्ष शरद पवार बांधकाम -विभागाचे उपअभियंता नरमिटवार तालुका क्रीडा अधिकारी, राहून श्रीरामवार, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी कृउबा सभापती बाबुराव केंद्रे गटनेते भास्कर पवार क्रीडा तज्ज्ञ बी डी- जाधव, अभियंता सोमवंशी, यासह पदाधिकारी यांनी पाहणी केली होती

क्रीडा संकुलात सैन्य व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुण-तरुणींसाठी धावण्याचा ट्रॅक , गोळा फेक, लांब उड्डी व शारीरिक चाचणी क्षमतासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सुविधा द्याव्यात

तसेच जीमची सोया ,बॅग व अन्य साहित्य ठेवण्यासाठी हॉल खुला करावा तसा सूचना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर योनी सार्वजनिक बांधकाम विभाग व क्रीडा अधिकारी यांना दिल्या होत्या त्यानंतर अवघ्या सहा दिवसात क्रीडा संकुल परिसराची स्वच्छता करण्यात आली . लाल माती टाकून ट्रॅक तयार करण्यात आला आहे त्यावेळी उपस्थिती भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांच्या समोर प्रतापरावांनी ज्या ज्या सूचना दिल्या त्याची पूर्तता झाली . त्यामुळे आपले हक्काचे आमदार असा भावना तरुणांनी व्यक्त केल्या प्रतापरावांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्ती झाली असून तरुणांना याचा पोलीस व सैन्य भरतीची तयारी करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे

## दरोड्यच्या तयारीत असलेल्या दरोडेखोरांना ग्रामीण पोलिसांकडून अटक




**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १० फेब्रूवारी-**

सिडको हडको परिसरातील नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील पांगरी परिसरातील एका पुलाखाली दरोडा टाकण्याच्या तयारी दबाधरून बसलेल्या सात दरोडेखोरा पैकी चार जणांना ग्रामीण पोलिसांनी पकडून त्यांच्याकडून पिस्टल, मॅक्झिन, दोन जिवंत काढतुस, खंजर, मिरची पूड, लोखंडी पाईप, नायलॉन दोरी व वेळूची काठी असा एकूण १ लाख ५३ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड ग्रामीण पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुनील भिसे व व्यंकट कुसमे यांच्या पथकांनी हद्दीत मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गस्त घालत असताना यांच्या पथकास विष्णुपुरी विद्यापीठ परिसरातील पांगरी शिवारात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या चार गुन्हेगारास पकडून अटक करण्यात आले. तर तीन जण पसार झाले . यातील अटक करण्यात आलेले शेख आयन शेख मुजीब वय १९ राहणार जवाहर नगर तुप्पा, मैफूज शेख सलीम व २१ राहणार महाडा कॉलनी नवीन कवठा, शुभम शिवाजी जाधव वय २७ राहणार धुमाळवाडी सर्जन नांदेड आणि सुजित सूर्यकांत चव्हाण वय २४ राहणार काळेश्वर नगर विष्णुपुरी नांदेड यांना अटक करण्यात आली असून फरार असलेल्या तिघाजणासह सात जनावर पोलीस हवालदार अर्जुन मुंडे यांच्या फिर्यादीनुसार दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नांदेड ग्रामीण पोलीस करत आहे.

## एनएसयुआय विद्यार्थी कॉँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश महासचिवपदी किरण पडलवार

**नांदेड** -विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कासाठी तसेच संघटनात्मक बांधणीसाठी



गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेले नांदेडचे झुंजार विद्यार्थी नेते किरण पडलवार यांची भारतीय राष्ट्रीय छात्र संघटना (छडणख) महाराष्ट्र प्रदेश महासचिवपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यातील विद्यार्थी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. एनएसयुआयचे राष्ट्रीय प्रभारी कन्हैया कुमार आणि राष्ट्रीय अध्यक्ष वरुण चौधरी यांच्या मान्यतेने, तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे यांच्या स्वाक्षरीने किरण पडलवार यांना हे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे. या निवडीनंतर किरण पडलवार यांच्यावर राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मुली व महिलांच्या सुरक्षिततेसाठी दामिनी पथकाची स्थापना करा: नगरसेविका अनुपमा गायकवाड

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १० फेब्रूवारी-**

शहरातील विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षितेसाठी दामिनी पथकाची स्थापना करण्यात यावी तसेच दोन आठवडी बाजार व सार्वजनिक ठिकाणे, शहरातील अनेक भागात पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी नगर परिषदेच्या नगरसेविका सौ. अनुपमा महेंद्र गायकवाड व नगरसेविका सौ. गोदावरी गंगाधर पुपलवार यांनी एका निवेदनाद्वारे बिलोली पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांच्याकडे केली आहे.

बिलोली शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात महिला व पुरुषांची, विध्यार्थ्यांची, शिक्षणासाठी मुलींची ये-जा असते तसेच शहरात दोन आठवडी बाजार भरतात या आठवडी बाजारात महिलांची संख्या जास्त असते.या दोन्ही बाजारात पोलिसांची गस्त वाढवावी व दोन दिवस पोलीस



कर्मचारी नियुक्त करावा जेणे करुन मोबाईल चोरी, दुचाकी चोरी व महिलांची छेड काढणाऱ्यावर वचक बसेल.असे निवेदनात म्हण्टले आहे. शहरातील अनेक भागात चोरीचे प्रमाण वाढले असून चोरांना पोलिसांची भीती राहिली नाही. त्यामुळे चोरीचे प्रमाण वाढले आहे.शहरात व परिसरात शाळा महाविद्यालय असल्याने शिक्षणासाठी मुली शहरातुन व ग्रामीण भागातून प्रमाणात येतात. तसेच सकाळी, संध्याकाळी महिला वॉकिंगसाठी घरातून निघतात त्यामुळे मुली व महिलांच्या सुरक्षित्तेसाठी दामिनी पथकाची स्थापना करण्यात यावी. शहरातील बसस्थानक, सार्वजनिक ठिकाण, शाळा, महाविद्यालय सारख्या ठिकाणी पोलीस गस्त वाढवावी त्यामुळे विदयार्थीनी, महिला सुरक्षित राहतील व चोरीवर आळा बसेल, कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही.असे सौ. गायकवाड व सौ पुपलवार यांनी निवेदनात नमूद केले आहे. पोलीस अधिकाऱ्यानी तात्काळ दामिनी पथकाची स्थापना करून पोलीस गस्त वाढवावी अशी मागणी नगरसेविका सौ. अनुपमा महेंद्र गायकवाड, नगरसेविका सौ. गोदावरी गंगाधर पुपलवार यांनी केली आहे.

**टवाळखोरांची गय केली जाणार नाही- स.पो.नि. कमल शिंद,**

मुली व महिलांची छेड काढणाऱ्यांची, टवाळखोरांची गय केली जाणार नाही. जागरूक नागरिकांनी व लोकप्रतिनिधीनी आपल्या भागातील विद्यार्थिनीना, महिलांना, कसल्याही प्रकारचा त्रास जर कोणी देत असेल तर पोलीस स्टेशनला प्रत्यक्ष येऊन किंवा मोबाईलद्वारे कळवावे असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### रस्ता सुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन

**पुणे:** तरूणांमध्ये रस्त्यावर सुरक्षित राइडिंग सवयींना चालना देण्याप्रती सुरू असलेल्या प्रयत्नांशी बांधील राहत होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया (एचएमएसआय) ने आज पुणे, महाराष्ट्र येथे रस्ता सुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन केले. या उपक्रमांतर्गत आर्मी पब्लिक स्कूल, देहू रोड येथील २,४३० हून अधिक सहभागींमध्ये जनजागृती करण्यात आली, जेथे रस्त्यावर जबाबदारीने ड्रायव्हिंग वर्तणूक आणि मुलभूत वाहतूकीच्या नियमांबाबत जागरूकतेचा प्रसार करण्यात आला.

### पुण्यात बीश्बी बैठका आयोजित करणार आहे

**पुणे :** शारजाह एअरपोर्ट इंटरनॅशनल फ्री झोन (सैफ झोन), शारजाह, युएई सरकार आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर यांच्या सहकार्याने, युएईद्वारे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये तुमचा व्यवसाय वाढवा या थीमवर केंद्रित असलेल्या बी२बी बैठकांची मालिका पुण्यात आयोजित केली जाईल. बी२बी बैठका १०-११ फेब्रुवारी २०२६ रोजी पुण्यातील जे डब्ल्यूमॅरियट हॉटेल येथे आयोजित केल्या जातील. पुणे आणि महाराष्ट्रातील व्यापक क्षेत्रातील व्यवसायांमध्ये यूएई मध्ये, विशेषतः सैफ झोनद्वारे, ऑपरेशन्स स्थापन करण्याच्या फायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

### जिल्हा परिषद निवडणुकीतही देवेंद्र - रविंद्र

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सर्वाधिक जागा पटकाविण्यात पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने महायुतीतील सहकारी पक्षांपेक्षा आणि मविआ आघाडी पक्षांपेक्षा अधिक जागा जिंकून राज्यातील जनतेचा कौल आपल्यालाच आहे हे परत सिद्ध केले. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हीच राजकारणातील आजची जोडी नं. १ असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

### होणार चिमुकल्या स्वप्नांची रंगीबेरंगी उधळण

**छत्रपती संभाजीनगर :** पहिल्या पर्वाला लहान मुलांकडून भरभरून मिळालेल्या प्रतिसादानंतर, ड्रोवी पुन्हा सज्ज आहे चिमुकल्यांच्या पसंतीस पडलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचे दुसरे पर्व म्हणजेच सीझन २ घेऊन येण्यासाठी. यानिमित्ताने त्यांना आपल्या मुक्त छंद विचारातून आणि कलेच्या माध्यमातून आपली कलाकृती साकारण्याची आणि व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेची अंतिम तारीख २० फेब्रुवारी २०२६ असून, निकाल २८ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात येतील. इच्छुक स्पर्धक आपला सहभाग बालरोगतज्ज्ञांच्या दवाखान्यांमधून, रिटेल आउटलेट्समधून किंवा क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन नोंदवू शकतील. स्पर्धक नोंदणी प्रक्रियेची माहिती मिळवण्यासाठी आणि आपला सहभाग नोंदवण्यासाठी खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करा किंवा व्हाट्सप वर ९९३००३१५८२ या क्रमांकावर हाय असा मेसेज पाठवा.

### झी टीव्ही कलाकारांकडून 'व्हॅलेंटाइन डे' निमित्त प्रेमाच्या विविध रूपांचा उत्सव

**छत्रपती संभाजीनगर :** 'लक्ष्मी निवास', 'तुम से तुम तक', 'जगद्धात्री', 'जाने अनजाने हम मिले', 'गंगा माई की बेटियाँ' आणि 'वसुधा' या झी टीव्ही मालिकांतील कलाकारांनी 'व्हॅलेंटाइन डे' निमित्त प्रेमाच्या विविध छटा उलगडल्या. मानसी जोशी रॉय यांनी दररोज व्यक्त होणाऱ्या प्रेमालाच खरी किंमत असल्याचे सांगितले. निहारिका चौक्सीने विश्वास, संयम आणि मैत्री यांवर आधारलेले नाते महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. सयंतानी घोष यांनी भपकेबाज साजरेपणापेक्षा एकत्र शांत वेळ घालवणे अधिक प्रिय असल्याचे सांगितले. आयुषी खुराणाने दैनंदिन समजूतदारपणा आणि साथ हीच प्रेमाची ताकद असल्याचे स्पष्ट केले. अमनदीप सिद्धूने विश्वास, आदर आणि कुटुंबातून मिळालेल्या मूल्यांचा उल्लेख केला. अभिषेक शर्माने प्रेम केवळ जोडीदारापुरते मर्यादित नसून कुटुंब, मैत्री आणि स्वतःबद्दलच्या जाणीवेतही असते, असा संदेश दिला. सर्व कलाकारांनी प्रेम ही एक दिवसापुरती भावना नसून आयुष्यभर जगायची मूल्यव्यवस्था असल्याचे अधोरेखित केले.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका : महापौरपदी समीर राजूरकर, उपमहापौरपदी राजेंद्र जंजाळ विजयी

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० फेब्रुवारी :** महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकांत अनुक्रमे भाजप व शिवसेनेने विजय मिळवत सत्तेचे चित्र स्पष्ट केले. महापौरपदी भारतीय जनता पक्षाचे समीर राजूरकर तर उपमहापौरपदी शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांची निवड झाली.



महापौरपदाच्या निवडणुकीत समीर राजूरकर यांनी एमआयएमचे उमेदवार अशोक हिवराळे यांचा ३७ मतांनी पराभव केला. एकूण ११५ मतांपैकी राजूरकर यांना ७० मते मिळाली, तर हिवराळे यांना ३३ मतांवर समाधान मानावे लागले.

उपमहापौरपदाच्या निवडणुकीतही तत्सम चित्र दिसून आले. शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांनी एमआयएमचे उमेदवार मोहम्मद वसीम अहमद यांचा ३७ मतांनी पराभव केला. जंजाळ यांना ११५ पैकी ७० मते मिळाली, तर मोहम्मद वसीम अहमद यांना ३३ मते मिळाली.

महापौर आणि उपमहापौर या दोन्ही निवडणुकांत वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तसेच यूबीटी यांनी तटस्थ भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले. या भूमिकेमुळे मतदानाचे गणित सत्ताधारी पक्षांच्या बाजूने झुकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

या निकालांमुळे महानगरपालिकेतील नेतृत्व निश्चित झाले असून आगामी काळातील प्रशासन, विकासकामे आणि धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत सत्ताधारी पक्षांचा प्रभाव राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



## गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद गटातून व पंचायत समिती गनातून भाजप , शिवसेनेचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर, दि. १० फेब्रुवारी :** गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद गटात व पंचायत समिती गणातून भाजपाने सर्वाधिक जागा मिळवत विजयाचा झेंडा उभारला आहे.भाजपाचे जिल्हा परिषद गटातून विजयी झालेले उमेदवार संगीता संदीप आमराव (सावंगी) रतन बत्तीसे (आंबेलोहळ) अमोल लोहकरे (रांजणगाव शेणपुंजी) सविता संतोष जाधव (शिल्लेगाव) शिवसेनेच्या स्वाती योगेश पाटेकर (तुर्काबाद) या निवडून आले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बालाजी रघुनाथ सोनटक्के (वाळूज) सौ.वैजयंती वाल्मीक शिरसाठ-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (नेवरगाव) तर शेंदूरवादा गटातून शिवसेना (उबाठा) गटाचे कृष्णा पा.डोणगावकर निवडून आले तर जामगाव गटातून अपक्ष उमेदवार सौ.दीपा सचिन मुंदडा या निवडून आलेल्या आहेत.

### जामगाव गटातून अपक्ष दीपा सचिन मुंदडा विजयी

पंचायत समिती गणातून भाजपाचे सहा उमेदवार निवडून आले कविता रवींद्र चव्हाण ( माळीवाडगाव) पाखरे सुनील सर्जेराव (सावंगी) थोरात सावळीराम भानुदास (आसेगाव) संजीवनी दीपक सदावर्ते (रांजणगाव शेपू) संगीता गणेश ठोकळ (जोगेश्वरी) बाबासाहेब दत्तू पिठले (तुर्काबाद) तर शिवसेना शिंदे गटाचे पाच उमेदवार निवडून आले आहेत यात ज्योती संतोष आरगडे (वाळूज) मंगलाबाई ज्ञानेश्वर निळ (लिंबे जळगाव) मोहिनी जगदीश साळुंके (घोडेगाव) राजेश्वर कल्याण हिवाळे (वाहेगाव) कांता किशोर गायकवाड (नेवरगाव) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदीप भास्कर सोनवणे (आंबेलोहोळ) शुभम नारायण बोर्हाडे (शिल्लेगाव) दादासाहेब कारभारी जगताप ( सिद्धनाथ वाडगाव) शिवसेना (उबाठा) चे मेनका कैलास म्हस्के (गुरुधानोरा) रावसाहेब मोहन टेके (शेंदूरवादा)व अपक्ष मालती लक्ष्मण सांगळे (जामगाव) बळीराम वसंत खताळ अपक्ष (कायगाव) हे निवडून आलेले आहेत. सर्वच विजयी उमेदवारांनी जल्लोष साजरा करत गुलाल उधळत आनंद व्यक्त केला. निवडणूक विभागाकडून निवडणूक निर्णय अधिकारी विजय साहेबराव राऊत व सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार नवनाथ वगवाड यांनी काम पाहिले पोलीस प्रशासनाकडून उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश पालवे पोलीस निरीक्षक कुमारसिंह राठोड शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस आदींनी चोख बंदोबस्त ठेवला.

## वत्सलाबाई गिरी; आज अंत्यसंस्कार



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १० फेब्रुवारी :** आमखेडा येथील वत्सलाबाई अमृत गिरी (वय.८५) यांचे दि.१० मंगळवार रोजी सकाळी ११:३० वाजता निधन झाले.त्यांचेवर दि.११ बुधवार रोजी सकाळी १०:०० वा.त्यांच्यावर समाधीस्त अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात सहा मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.सोयगाव वकील बार संघांचे अध्यक्ष ड.राजेश भैय्या गिरी यांच्या त्या मातोश्री होत.

## शेतकरी बांधवांनी उत्पन्न वाढीसाठी जास्तीत जास्त दर्जेदार सिंगल सुपर फॉस्फेट चा वापर करावा : महाव्यवस्थापक सुनिल पाटील

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १० फेब्रुवारी :** गुणवत्ता हीच आमची खरी ओळख असून शेतकरी बांधवांनी शेतातील मातीची सुपीकता कायम टिकवून राहावी, त्यासाठी व उत्पन्न वाढीसाठी दर्जेदार सिंगल सुपर फॉस्फेट खताचा जास्तीत जास्त वापर करावा त्यासाठी केंद्र व राज्य शासन विविध स्तरावर उपाययोजना करीत आहे असे आवाहन आरती इंडस्ट्रीजचे महाव्यवस्थापक सुनिल पाटील यांनी जालना येथे संपन्न झालेल्या विक्रेता बंधूंच्या संमेलनात केले. यावेळी नविन सारीगाला ( वरिष्ठ व्यवस्थापक), विनायक पाटील धंधर, पांडूरंग सहाणे पाटील, निलेश पाटील, एम.के.कटारिया यांची प्रमुख उपस्थिती होती.




या वेळी सुनील पाटील (राष्ट्रीय वरिष्ठ महाव्यवस्थापक व्यवस्थापक) यांनी पुढे बोलतांना सांगितले की, डी.ए.पी. खताला पर्याय सिंगल सुपर फॉस्फेट खत आहे.व आरती इंडस्ट्रीज ने सिंगल सुपर फॉस्फेट खता मध्ये गुणवत्ता टिकवून ठेवली आहे. त्यासाठी विक्रेते बांधवांनी शेतकऱ्यांना दर्जेदार सिंगल सुपर फॉस्फेट खत उपलब्ध करून द्यावे असे आवाहन यावेळी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवीन सरिगला यांनी केले तर आभार वैभव गोरे यांनी मानले.

या स्नेहसंमेलनाला गैरव सहाणे, निलेश धंधर, कंनटूले नाना,देशमुख, सांगळे आदींसह राज्यातील नामांकित खत विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहसंमेलन यशस्वीते साठी वैभव गोरे, मोहीत उपाध्याय, गणेश शिंदे, विलास अंधळे, रामेश्वर बनकर यांनी परिश्रम घेतले.

## कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. १० फेब्रुवारी :** कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर कृष्णराव जाधव उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी सभाहत मोहम्मद, संतोष मतसागर, राजू अवचार, केंद्रप्रमुख कैलास लाडके, साधनव्यक्ती संदीप कुलकर्णी, विनोद राठोड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक के. जी. निकम, ए. पी. चव्हाण, रावसाहेब निकम, संजय शिरसाट तसेच वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव यांची उपस्थिती होती.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. इयत्ता दहावीतील आदर्श विद्यार्थी म्हणून यशवंत संजय कुमार काळे, साक्षी विजय राठोड आणि सोनिया अजिनाथ गायके यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच गुणानुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

निरोप समारंभात दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू दिली. यावेळी साक्षी काळे, तन्वी आढाव, अक्षर तांबट, अंजली निकम, अक्षरा मुरकुंडे व साक्षी राठोड या विद्यार्थिनींनी भावपूर्ण मनोगत व्यक्त केले.

मार्गदर्शन करताना संतोष मतसागर यांनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने प्रत्येक आव्हानाला सामोरे जावे, असे सांगितले. तर राजू अवचार सर यांनी गीतातून विद्यार्थ्यांना संदेश देत आई-वडील व गुरुजनांचा सन्मान करण्याचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय समारोपात सागर जाधव यांनी विद्यार्थ्यांनी पुढील वाटचालीत मित्रांची निवड काळजीपूर्वक करावी, येणारा काळ आव्हानात्मक असून सजग राहण्याचा सल्ला दिला.

याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक के. जी. निकम, ए. पी. चव्हाण व संजय शिरसाट यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप सनान्से यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक गणेश डव्हारे यांनी केले.

## अजिंठा येथे बारावीची परीक्षा सुरळीत



**तभा वृत्तसेवा**

**अजिंठा, दि. १० फेब्रुवारी :** अजिंठा येथे बारावीची परीक्षा मंगळवारी १० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा पहिला पेपर दिला आहे. ही परीक्षा नेहमीप्रमाणे कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाचे बैठे पथकांने अजिंठा येथील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय व नेहरू मेमोरियल उर्दू शाळेच्या परीक्षा केद्राला भेट दिली असता त्यांना कॉपी मुक्त वातावर परीक्षा सुरळीत सुरु असल्याचे दिसून आले.

यावेळी प्रभारी गट शिक्षण अधिकारी रमेश ठाकुर, शिक्षण विस्तार अधिकारी आर. डी. फुसे, केद्र प्रमुख अनिल परसे, केंद्र संचालक सय्यद माहीनोद्दीन, मुख्याध्यापक सय्यद मुनीरोद्दीन, शिक्षक कबीर फारुकी, शिक्षक अमान शेख, म. फुले मुख्याध्यापक मनोज देशमुख, शिक्षक ढापके, शिक्षक बुलबुले आदी उपस्थित होते.

# दिव्यांग मॅरेथॉनमध्ये एमजीएमच्या ३०० स्वयंसेवकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १० फेब्रुवारी :** नवजीवन सोसायटी फॉर रिसर्च अँड रिहॅबिलिटेशन ऑफ मेंटली हँडिकॅप्ड या संस्थेच्या वतीने स्वमग्न (ऑटिझम) मुलांसाठी 'दिव्यांग शक्ती रन २०२६' या मॅरेथॉनचे आयोजन सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले होते. या मॅरेथॉनमध्ये एमजीएम विद्यापीठ आणि एमजीएम स्कूल्समधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून आपला सहभाग नोंदवला.

या मॅरेथॉनला एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. आर. आर. देशमुख, एमजीएम विद्यापीठ व एमजीएम स्कूल्समधील विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स तसेच सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने आयोजित केल्या जाणाऱ्या या उपक्रमात यंदा दिव्यांग बांधवांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. दिव्यांगांच्या क्षमतांवर विश्वास ठेवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा सकारात्मक संदेश या मॅरेथॉनच्या माध्यमातून देण्यात आला.

कै.जवाहरलाल गांधी, कै. श्रीमती नलिनी शाह यांच्या प्रेरणेतून सुरू झालेली आणि अध्यक्षा सौ. शर्मिला गांधी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेली नवजीवन शाळा दिव्यांग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आदर्श ठरत आहे.



स्वमग्न मुलांचे जीवन केवळ सुखकरच नव्हे तर त्यांच्या सुप्त गुणांना व कर्तृत्वाला समाजासमोर आणण्याचे कार्य ही संस्था सातत्याने करत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून एमजीएमचे विद्यार्थी नवजीवन शाळेशी सक्रियपणे जोडले गेले आहेत.

या स्पर्धेत अंध, अपंग, वृद्ध अशा विविध प्रवर्गातील दिव्यांग स्पर्धक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. प्रत्येक स्पर्धकासोबत एक स्वयंसेवक चालत अथवा धावत होता. आपले अपंगत्व, वेदना आणि मर्यादा विसरून स्पर्धकांनी केवळ आनंदासाठी आणि जगण्याचा उत्सव साजरा करण्यासाठी मॅरेथॉन पूर्ण केली.

सुमारे दोन तास चाललेल्या या मॅरेथॉनने विद्यार्थ्यांना केवळ शारीरिक नव्हे तर मानसिक आणि भावनिक पातळीवरही अंतर्मुख केले. छोट्या-छोट्या कारणांसाठी तक्रार करणारी, सतत तुलना करणारी आणि संवाद हरवत चाललेली तरुण पिढी या दिव्यांगांच्या सकारात्मकतेपुढे स्तब्ध झाली.

दिव्यांगांच्या जिद्दीला सलाम करत एमजीएमच्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून काम करण्याची संधी दिल्याबद्दल नवजीवन शाळा, सौ. शर्मिला गांधी, जोशी सर आणि सर्व सहकाऱ्यांचे एमजीएम परिवारातर्फे आभार मानण्यात आले.

### जाहिर प्रगटण/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर**

सिव्हिल एम ए. क्र. ६७ / २०२६

अर्जदार :- १) साहेबसिंग रामचंद्र जारवाल वय ५० वर्ष धंदा शेती रा. फतुलाबाद ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर २) संजय रामचंद्र जारवाल वय: ४३ वर्ष धंदा शेती रा. फतुलाबाद ता. गंगापूर, जि छत्रपती संभाजीनगर ३) गोकुळ रामचंद्र जारवाल वय: ३०वर्ष धंदा शेती रा. फतुलाबाद ता. गंगापूर, जि छत्रपती संभाजीनगर ४) सुनीता जवाहरलाल खोलवाल वय: २९वर्ष धंदा घरकाम रा. डोंगरगाव पोस्ट चिखली ता. जि. जालना

विरुद्ध

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एस. बी. सावंत यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील नामे रामचंद्र राजाराम जारवाल हे मौजे फतुलाबाद, ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते व ते दिनांक ०९/०१/२०२५ रोजी फतुलाबाद ता. गंगापूर, येथे मयत झाले असून त्यांच्या पत्नी नामे देवकाबाई रामचंद्र जारवाल यांचा पूर्वीच मृत्यू झालेल्या आहे. तसेच मयत रामचंद्र राजाराम जारवाल यांच्या आई नामे सोनाबाई यांचा मृत्यू झालेला आहे. मयत रामचंद्र राजाराम जारवाल व देवकाबाई रामचंद्र जारवाल यांना अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र. ४ ही त्यांची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्र. १ ते ४ शिवाय मयत रामचंद्र राजाराम जारवाल व देवकाबाई रामचंद्र जारवाल यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाही करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहेत. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. प्रकणात पुढील तारीख ०९/०३/२०२६ आहे. करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी

आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी दिले.

कनिष्ठ लिपिक. सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३१/२०२६.

अर्जदार-

१)यमुनाबाई गोविंदा पाटील, वय ७० वर्षे, धंदा, घरकाम, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद. २)गुरुदास गोविंदा पाटील, वय ३२ वर्षे, धंदा, शेती, रा. हाऊस नं. २७, एन-१२, हडको, औरंगाबाद, ३)वैशाली ज्ञानेश्वर पाटील, वय. ३६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. चाहर्डी, चोपडा, जि. जळगांव. ४)रुपाली किरण महाजन, वय, ३० वर्षे, धंदा. घरकाम, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद.

-विरुध्द-

गैरअर्जदार :- कोणीही नाही.

प्रकरण :-वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत गोविंदा काशिनाथ उर्फ काशिराम पाटील हे दि. १९/०८/२०२५ रोजी मौजे. जरंडी, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत गोविंदा काशिनाथ उर्फ काशिराम पाटील यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- १६/०३/२०२६. आज दि.१०/०२/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

**विभागीय लिपीक,**
**(दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव)**
**आदेशांवरुन**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगाव)**

प्रत :

१)दिवाणी न्यायालय, क स्तर, सोयगांव नोटीस बोर्ड.

२)ग्राम पंचायत, जरंडी, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर**

सिव्हिल एम.ए. क्र. ९३ / २०२६

अर्जदार:-१) नवनाथ रामभाऊ उर्फ रामराव परभणे वय ६२ वर्षे, धंदा शेती रा भेंडाळा ता गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर २) संगिता भ्र. गंगाधर शिंदे वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. सिध्दपुरवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) चंद्रकला भ्र. जालींदर परभणे वय ५७ वर्षे धंदा शेती रा. भेंडाळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) संदिप जालींदर परभणे वय ३७ वर्षे धंदा शेती रा. भेंडाळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) दिपक जालींदर परभणे वय ३५ वर्षे धंदा शेती रा. भेंडाळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) सौ. अनिता दिपक शेळके वय ३४ वर्षे धंदा शेती रा. कीठा ता. नेवासा जि. अहिल्यानगर ७) कल्पना भ्र. साईनाथ परभणे, वय ४५ वर्षे धंदा शेती रा. भेंडाळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ८) गोरव साईनाथ परभणे वय २४ वर्षे धंदा शेती, रा. भेंडाळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ९) सौ. वर्षा दत्तात्रय चक्रे, वय २८ वर्षे धंदा शेती, रा. खोजेवाडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेग्युलेशन क्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. रविराज बी. दारूंटे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, रामभाऊ पांडुरंग परभणे व लिलाबाई रामभाऊ परभणे हे दोघे आपसांत नात्याने पती पत्नी असुन ते मोजे भेंडाळा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील कायमचे रहिवाशी होते. त्यापैकी रामभाऊ पांडुरंग परभणं हे दिनांक ०९/११/२०२५ रोजी मौजे भेंडाळा ता. गंगापुर येथे मयत झाले असुन लिलाबाई रामभाऊ परभणे या यापुर्वीच दिनांक ११/१०/२०१५ रोजी मयत झालेल्या आहे. दोन्ही मयतांना तीन मुले नामे जालीदररामभाऊ, साईनाथ रामभाऊ व अर्जदार क्र. १ नवनाथ आणि एक मुलगी अर्जदार क्र. २ संगिता गंगाधर शिंदे अशी अपत्ये होती, त्यापैकी जालींदर रामभाऊ परभणे हे दिनांक ०१/०५/१९९५ रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र. ३ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.४ व ५ हे मुले व अर्जदार क्र. ६ ही मुलगी असे वारस आहेत व तसेच साईनाथ उर्फ शाईनाथ रामभाऊ परभणे हे दिनांक १२/०८/२०१० रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र. ७ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.८ हा मुलगा व अर्जदार क्र.९ ही मुलगी असे वारस आहेत. येणे प्रमाणे मयत रामभाऊ पांडुरंग परभणे व मयत लिलाबाई रामभाऊ परभणे यांना अर्जदार क्र.१ ते ९ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. करीता मयताचे मृत्युपश्र्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या मा. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप- उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिद्ध झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक

१०/०३/२०२६ रोजीची आहे.

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**